दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २२४ | बुधवार २७ मे २०२६

| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com


**महाराष्ट्र–योग भूमी...** सर्व विश्वामध्ये ही पृथ्वी विशेष, आणि, त्यात हा भारतखंड फार विशेष. हा परमेश्वरानं, विशेष रूपाने सजवलेला आहे. ही योग भूमी आहे. दुसऱ्या देशामध्ये योग नाही,धर्मावर विचार नाही, फक्त उपभोगावर,इथे भोग हे मुख्य आहे. जो पर्यंत माणसाला परमेश्वर मिळत नाही तो पर्यंत, एक भारतीय,त्याला वाटतं माझ्या आयुष्याला काही अर्थ लागला नाही, अजून परमेश्वर काही मिळालेला नाही. पण इतर सर्व देशामध्ये भोग मिळाला पाहिजे, माझ्या जवळ एक मोटार असली तर दहा मोटारी असल्या पाहिजेत, एक घर असलं तर दहा घरं असली पाहिजेत. नाना तऱ्हेचे भोग, घाणेरडे भोग, अत्यंत दृष्टतेला नेणारे, सर्व विध्वसंक भोग, त्याकडे माणसं झुकली. तर सर्व प्रथम म्हणजे आपल्या भारत भूमीला योगाचं केवढं मोठं साधन मिळालेलं आहे. त्यातल्या त्यात आपला महाराष्ट्र म्हणजे साधू संतांची नुसती ढेप. कितीतरी साधू संतांनी ह्या पूर्ण महाराष्ट्रावर जन्म घेतला. त्याला काही तरी कारण असायला पाहिजे. ज्ञानेश्वरांसारख्या महान, येथे अवतारच होते. आणि तो अवतार फार मोठा होता. तुम्ही त्या महाराष्ट्रातले धार्मिक दिवे आहात. आणि त्याची अत्यंत सुंदर जोपासना करून तुम्हाला तयार केलेलं आहे. पण प्रत्येक साधू संत जिवंत असताना मात्र आपण त्यांना मानत नाही. स्वतः ज्ञानेश्वर जेव्हा जिवंत होते, त्यांनी इतक्या हाल अपेष्टा सहन केल्या.ह्या महाराष्ट्रात किती साधू संतांना आपण छळलेलं आहे. ते जिवंत असताना त्यांची आपण कधीच किंमत केली नाही त्याला कारण असं की ते सर्व साधारण लोकांसारखे राहत होते. त्यांना काय प्राप्त झालेलं आहे, ते कोणच्या स्थितीला आहेत, ते जाणण्याची आपल्यामध्ये पात्रता नाही,आपले डोळे आंधळे होते.ते सहजयोगद्वारे आपण जाणून घेऊ शकतो. ११ जानेवारी १९८० अकुर्डी अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी



'सहजयोग'
भाग ६३

# अशोकनगराला २४० दशलक्ष बॅरलपेक्षा अधिक कच्च्या तेलाचा साठा!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोलकाता :** इराण–अमेरिका संघर्षामुळे जागतिक तेल बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली असताना भारतासमोरही इंधन पुरवठ्याचे संकट उभे राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अशा परिस्थितीत पश्चिम बंगालमधील कोलकाताजवळील अशोकनगर परिसरातून लवकरच कच्च्या तेलाचे उत्खनन सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कोलकात्यापासून सुमारे ४८ किलोमीटर अंतरावर असलेल्या अशोकनगर भागात सुमारे आठ वर्षांपूर्वी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचे मोठे साठे आढळले होते. आता या क्षेत्रातून प्रत्यक्षात कच्चे तेल काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी हालचाली वेगाने सुरू झाल्याची चर्चा आहे. बंगाल भाजपचे प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य यांनी शनिवारी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या बैठकीत पश्चिम बंगालच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. या चर्चेदरम्यान औद्योगिकीकरणाला चालना देणे आणि उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील अशोकनगर तेलक्षेत्रात उत्पादन सुरू करण्यासाठी तातडीने पावले उचलण्यावर विशेष भर देण्यात आला. कोलकात्याजवळील अशोकनगर तेलक्षेत्र हे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू उत्खननासाठी महत्त्वाचे केंद्र मानले जात आहे. वर्ष २०१८ मध्ये ओएनजीसीने या क्षेत्राचा शोध लावला होता. पूर्व भारतातील हे पहिले तेल आणि वायू उत्पादन क्षेत्र मानले जाते. प्राथमिक अंदाजानुसार येथे २४० दशलक्ष बॅरलपेक्षा अधिक कच्च्या तेलाचा साठा असू शकतो.

एका सूत्राच्या माहितीनुसार आता राज्यात भाजपची सत्ता आल्यामुळे ओएनजीसी ला प्रकल्प पूर्ण करण्यात कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**इराण–अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर वाढले महत्त्व**

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अशोकनगर तेलक्षेत्राचे महत्त्व आणखी वाढले आहे. या क्षेत्रात यापूर्वी ड्रिलिंगचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र विधानसभा निवडणुकांपूर्वी काही स्थानिक वाद निर्माण झाल्याने हे काम थांबवण्यात आले होते.

# कांद्याचे आंदोलन पेटले



## चांदवडमध्ये रोहित पवार, दानवेंसह हर्षवर्धन सपकाळ पोलिसांच्या ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** कष्टाने पिकवलेल्या कांद्याला बाजारात मातीमोल भाव मिळत असल्याने राज्यातील शेतकरी कमालीचा संतप्त झाला आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या याच प्रश्नावर आता महाविकास आघाडी आक्रमक झाली असून राज्यात ठिकठिकाणी जोरदार रस्ता रोको आंदोलन करण्यात येत आहे. आंदोलक कार्यकर्ते आणि नेत्यांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून सरकारविरोधात तीव्र आक्रोश व्यक्त केला आहे. तर कांद्याच्या दरावरून चांदवडमध्ये आंदोलन चिघळले आहे. रोहित पवार, अंबादास दानवेंसह हर्षवर्धन सपकाळ यांनी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड चौफुली येथे मुंबई–आग्रा राष्ट्रीय महामार्गावर शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. कांद्याला किमान २४ रुपये हमीभाव मिळावा आणि विकलेल्या कांद्याला १५ रुपये अनुदान मिळावे, या प्रमुख मागण्यांसाठी हा आक्रोश महामोर्चा काढण्यात आला. या मोर्चात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना नेते अंबादास दानवे, राष्ट्रवादी आमदार रोहित पवार, शशिकांत शिंदे आणि भास्कर भगरे यांच्यासह हजारो शेतकरी सहभागी झाले होते. या आंदोलनामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या आणि वाहतूक पूर्णपणे कोलमडली होती. आंदोलनादरम्यान बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले की, कांद्याला भाव मिळतोय का? नेते सांगतात की येत्या काळात पाऊस पडणार नाही. (पान ४ वर)




### आंदोलकांनी गाडीची हवा सोडली, टायरची जाळपोळ

**सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोर सोलापूर शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या उपस्थितीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रचंड निदर्शने केली. या आंदोलनात खासदार प्रणिती शिंदे सहभागी झाल्या. काँग्रेस कार्यकर्त्यांनी सोलापूर–पुणे आणि सोलापूर–हैदराबाद हे दोन्ही राष्ट्रीय महामार्ग रोखून धरले. पोलिसांनी आंदोलनापूर्वी प्रसिद्धी प्रमुख तिरुपती परकीपंडला यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांना कायदेशीर कारवाईची नोटीस बजावली होती, मात्र काँग्रेस आंदोलनावर ठाम राहिली.**

# राज्यात इंधनाची ५२ टक्के साठेबाजी!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कारवाईचे आदेश



**■ राज्यात सध्या इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. मात्र, सोशल मीडिया आणि इतर माध्यमांवर पसरलेल्या अफवांमुळे नागरिक नेहमीपेक्षा ५२ टक्के जास्तीची इंधन खरेदी करत आहेत. या अतिरेकी खरेदीमुळे तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. ही ५२ टक्के अतिरिक्त इंधन खरेदी नेमकी कोण करतंय आणि यामध्ये कोण साठेबाजी करतंय, याचा तात्काळ शोध घेऊन पुरवठा व गृह विभागाने कडक कारवाई करावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** राज्यात पेट्रोल आणि डिझेलची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यात कुठेतरी साठेबाजी होत आहे, असे देखील निदर्शनास येत आहे. त्यासंदर्भात पुरवठा आणि गृह विभाग आता कारवाई करतील. पेट्रोल संदर्भात जो काही सरासरी वापर आहे त्यापेक्षा २३ टक्के जास्त मागणी वाढली आहे. डिझेलच्या संदर्भात ही मागणी ५२ टक्क्यांनी वाढली आहे. काही ठिकाणी तर ७० टक्के जास्त पुरवठा झाला आहे. त्यामुळे साठेबाजी थांबवण्याचा निर्णय घेतला असून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश देण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्यात सध्या सुरू असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या आणि इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आदेश दिले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विरोधकांच्या आंदोलनाचा खरपूस समाचार घेतला, तसेच राज्यातील इंधन पुरवठ्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना साठेबाजांवर कारवाईचे आदेश जारी केले आहेत.

कांदा दरावरून सुरू असलेल्या आंदोलनावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कालच केंद्र सरकारने कांदे खरेदीचा भाव साडेतीन रुपयांनी वाढवून जवळपास पंधरा रुपयांपर्यंत नेलेला आहे. कांद्याची मोठ्या प्रमाणावर खरेदी देखील सुरू केलेली आहे. आम्ही केंद्र सरकारला या संदर्भात बैठक घेण्याची विनंती केली होती. उद्या (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### बेलापूरात बंदुकीतून चोरट्यांवर फायर!

श्रीरामपूर : तालुक्यातील बेलापूर व केसापूर या घटनेनंतर आता उक्कलगाव –गळनिब परिसरात ड्रोनने घिरट्याच्या वाढल्याने ग्रामस्थांत भीतीचे वातावरण पसरले आहेत.मात्र शेजारील गावात गेल्या दोन ते तीन दिवसापासून चोरट्याचा धुमाकूळ सुरू आहेत. मात्र,आसपासच्या गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या भीतीपोटी लोकही रात्र जागून काढत आहे. अचानकपणे ड्रोनच्या घिरट्या घरावरून जात असून,नेमकं काय प्रकार चालू आहे. हे समजून घेण्याआधीच दुसऱ्याच मिनिटात ड्रोनची दिशा बदलत गायब केले जात आहे. गेल्या दोन दिवसापूर्वी तालुक्यातील आंबी – दवणगाव येथे अनोळखी इसमांना पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु ते मोटारसायकल सोडून पसार झाले. त्यावेळी नागरिकांनी त्या मोटरसायकली तोडफोड केली.त्यानंतर काल पुन्हा केसापूर – आंबी –दवणगाव बेलापूर सातभाई वसाहत याठिकाणी रात्री ड्रोन फिरत होते. पोलिसांनीही अनेक ठिकाणी गस्त घातली. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाहीत.रात्री साडे आठ वाजताच बेलापूर– उक्कलगाव रोडवर असणाऱ्या शिवाजी वाबळे यांच्या वस्तीलगत सहा जण दबा धरून बसले, अशी असल्याचे त्यांच्या घरच्यांच्या लक्षात आले, त्यांनी ताबडतोब एकमेकांना फोन केले. त्यामुळे गावातील काही युवकही मदतीला धावले.

## लग्नाच्या स्वप्नांचा सामूहिक चुराडा!

# मंडप सजला, वऱ्हाडी जमले... पण नवरीच आली नाही

### सामूहिक विवाहाच्या नावाखाली ४२ तरुणांची लाखोंची फसवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**देवास :** मध्य प्रदेशातील देवास येथे सामूहिक विवाहाच्या नावाखाली तब्बल ४२ तरुणांची आर्थिक आणि मानसिक फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आयुष्याचा नवा प्रवास सुरू करण्याच्या आशेने भरजरी शेरवानी परिधान करून, गळ्यात फुलांचे हार घालून आणि मिठाईचे डबे हातात घेऊन हे सर्व नवरदेव आपल्या कुटुंबीयांसह विवाहस्थळी पोहोचले होते. मात्र तासन्तास प्रतीक्षा करूनही एकही नवरी मंडपात पोहोचली नाही आणि अखेर हा संपूर्ण विवाहसोहळाच फसवणुकीचा सापळा असल्याचे उघड झाले.




या घटनेने उपस्थित कुटुंबीयांमध्ये संताप, अश्रू आणि प्रचंड निराशेचे वातावरण निर्माण झाले. ग्रामीण भागातील साध्या–भोळ्या तरुणांना लक्ष्य करत एका टोळीने अनाथ मुलींचे सामूहिक विवाह या नावाखाली लाखो रुपयांचा गंडा घातल्याचे समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी इंदूरमधील एका आश्रमाच्या नावाचा आधार घेत विश्वास संपादन केला होता. त्यांनी मोबाईलवर मुलींचे फोटो पाठवत, या मुली गरीब आणि अनाथ आहेत. कोणत्याही अटीशिवाय लग्नासाठी तयार आहेत, असे सांगून तरुणांना जाळ्यात ओढले. प्रत्यक्षात हे फोटो सोशल मीडियावरून डाउनलोड केलेले मॉडेल्सचे असल्याचे नंतर उघड झाले.

प्रत्येक नवरदेवाकडून 'नोंदणी शुल्क' म्हणून १५ ते २५ हजार रुपये उकळण्यात आले. काहींना संसारोपयोगी साहित्य आणि हुंड्याचेही आमिष दाखवण्यात आले होते. लग्नासाठी देवास येथे बोलावून (पान ४ वर)

# अहिल्यानगर विधान परिषदेची जागा भाजप निष्ठावंताला मिळावी : सभापती राम शिंदे यांची अपेक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** संख्याबळ जास्त असल्याने विधान परिषदेच्या निवडणुकीची अहिल्यानगरची जागा भाजपकडेच राहील पक्षाची उमेदवारी भाजप पमधील निष्ठावंतांनाच मिळावी अशी माझी ही अपेक्षा आहे मात्र वेगळा निर्णय होऊ शकतो असे मत विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी व्यक्त केले. माजी खासदार सुजय विखे हेही इच्छुक असावेत, असा अंदाजही त्यांनी व्यक्त केला.

चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती मोहोत्सवाचे आयोजन ३१ मे रोजी करण्यात आली आहे. या महोत्सवाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत सभापती शिंदे यांनी हे मत व्यक्त केले. देवळालीचे नगराध्यक्ष सत्यजित कदम, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, अशोक खेडकर आदी उपस्थित होते.

उमेदवारीबाबत मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री निर्णय घेणार असले तरी वेगळा निर्णय होऊ शकतो. भाजपचे सत्यजित कदम, भानुदास बेरड, वसंत लोढा हे निष्ठावान इच्छुक आहेतच शिवाय माजी खासदार शिवजय विखे हेही इच्छुक असावेत. परंतु यापूर्वी (पान ४ वर)

# केंद्र सरकार कांदा, साखर उत्पादकांना दिलासा देणार

■ अमित शहा यांच्या उपस्थितीत आज दिल्लीत बैठक

■ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह विखे पाटील राहणार उपस्थित



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** राज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे – पाटील यांच्यासह इतर खात्याचे मंत्री उपस्थित राहणार आहेत.

केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातल्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. २०१९ मध्ये साखरेचे किमान विक्री मूल्य (एमएसपी) ३१ रुपये प्रति किलो निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर २०२६ पर्यंत एमएसपीमध्ये कोणतीही वाढ झाली नाही. पण, २०१९ मधील २,७५० रुपये प्रति टन असलेली एफआरपी वाढून २०२६ मध्ये २९.१० टक्क्यांनी वाढून ३५५० रुपयांवर गेली आहे. साखरेचा दर २०१९ पासून स्थिर आणि एफआरपीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने उद्योगाला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यासह (पान ४ वर)

# नागवडे यांच्या पेट्रोल पंपावर पाचपुतेंचा दरोडा; १५ जणांविरोधात गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील खपवळरप जळश्र ेउऑॅरींळेप कंपनीच्या पेट्रोल पंपावर भरदिवसा झालेल्या धाडसी मारहाण, तोडफोड आणि दरोड्याच्या प्रकाराने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दीपक नागवडे यांच्या मालकीच्या पेट्रोल पंपावर घडलेल्या या घटनेप्रकरणी विशाल रावसाहेब पाचपुते, अभिजित रावसाहेब पाचपुते, प्रतीक बाळासाहेब पाचपुते यांच्यासह १५ जणांविरोधात श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (दि. २६ मे) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास डिझेल भरण्याच्या किरकोळ कारणावरून सुरुवातीला पेट्रोल पंपावर वाद झाला. त्यानंतर काही वेळातच संबंधित आरोपी पुन्हा मोठ्या संख्येने पेट्रोल पंपावर दाखल झाले. त्यांनी पेट्रोल पंपाच्या कॅबिनच्या काचा फोडत परिसरात धुडगूस घातला. तसेच कर्मचाऱ्यांना मारहाण करून गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून घेतल्याचा आरोप फिर्यादी कृष्णा दीपक नागवडे यांनी केला आहे.

या अचानक घडलेल्या प्रकारामुळे पेट्रोल भरण्यासाठी आलेल्या ग्राहकांमध्ये घबराट पसरली होती. पंपावरील कर्मचाऱ्यांनाही मारहाण झाल्याने त्यांच्यावर उपचार करण्यात आले. काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोहर खिळदकर करत आहेत. दरम्यान, आरोपी अद्याप फरार असून पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू आहे.



# ‘चोरबाजार’चे राजकारण आणि दुटप्पीपणाची स्पर्धा

देशातील राजकारणात आरोप-प्रत्यारोप ही आता दैनंदिन बाब झाली आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष हा लोकशाहीचा भाग असला, तरी अलीकडच्या काळात राजकीय टीकेतील नैतिकता आणि सातत्य दोन्ही लोप पावत चालल्याचे चित्र दिसते. विशेषतः प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांवरून सुरू झालेला भाजप आणि काँग्रेसमधील संघर्ष हेच दाखवून देतो की, सत्तेत असताना एक भूमिका आणि विरोधात असताना दुसरी भूमिका घेणे हे आता सर्वच पक्षांचे राजकीय धोरण बनले आहे.

देशात भाजपचे सरकार सत्तेत येऊन बारा वर्षे पूर्ण झाली. या काळात भाजप आणि काँग्रेस यांच्यात संघर्षाचा एकही दिवस गेला नसावा. संसद असो, राज्य विधानसभांचे राजकारण असो किंवा सोशल मीडियावरील प्रचारयुद्ध असो, प्रत्येक मुद्द्यावर परस्परांवर टीका करणे हेच दोन्ही पक्षांचे प्रमुख राजकारण बनले आहे. मात्र पश्चिम बंगाल आणि केरळमधील अलीकडच्या प्रशासकीय नियुक्त्यांनी या संघर्षातील दुटप्पीपणा अधिक ठळकपणे समोर आणला आहे.

पश्चिम बंगालमध्ये भाजप सत्तेत आल्यानंतर विधानसभा निवडणूक प्रक्रियेचे नेतृत्व करणारे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज कुमार अगरवाल यांची राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान मतदार याद्यांमधून तब्बल ९१ लाख नावे वगळल्याचा आरोप झाला होता. त्यामुळे विरोधकांनी निवडणूक आयोगावर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि ममता बॅनर्जी यांनी अगरवाल यांच्या नियुक्तीवरून भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनी तर भाजप आणि निवडणूक आयोगाच्या चोरबाजारचा उल्लेख करत ही नियुक्ती म्हणजे मोठ्या चोरीचे बक्षीस असल्याचा आरोप केला.

लोकशाहीत सत्ताधाऱ्यांवर प्रश्न उपस्थित करणे हे विरोधकांचे कर्तव्यच आहे. परंतु याच निकषावर विरोधकांनी स्वतःचीही परीक्षा घ्यायला हवी. कारण केरळमध्ये काँग्रेस सत्तेत आल्यानंतर तेथील मुख्य निवडणूक अधिकारी रथन केळकर यांची मुख्यमंत्र्यांच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली. भाजपने पश्चिम बंगालमध्ये जे केले, त्याच धर्तीवरील निर्णय काँग्रेसने केरळमध्ये घेतला. त्यामुळे काँग्रेसची भूमिका नैतिकदृष्ट्या कमकुवत ठरते.

केरळचे मुख्यमंत्री सतीशन यांनी या नियुक्तीचे समर्थन करताना पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीतील नाव वगळण्यावरून आरोप झाले होते, केरळमध्ये तसे काही घडले नाही, असा युक्तिवाद




केला आहे. परंतु प्रश्न फक्त आरोपांचा नाही; प्रश्न आहे तत्त्वांचा. जर निवडणूक प्रक्रियेचे नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांना लगेचच राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या पदांवर नेमले जात असेल, तर निवडणूक यंत्रणेच्या निष्पक्षतेवर संशय निर्माण होणारच. मग तो निर्णय भाजपने घेतला असो वा काँग्रेसने.

खरे तर निवडणूक आयोगासारख्या संवेदनशील संस्थांबाबत सर्वच पक्षांनी अधिक जबाबदारीने वागण्याची गरज आहे. भारतातील लोकशाहीची ताकद ही निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासावर उभी आहे. जर निवडणूक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि त्यानंतरच्या राजकीय पदांवरील नेमणुका संशयाच्या भोवऱ्यात अडकल्या, तर सामान्य मतदाराच्या मनात संस्थांबद्दल अविश्वास निर्माण होतो. हा अविश्वास लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे.

प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या किंवा नियुक्त्या या कोणत्याही सरकारचा अधिकार असतो. नवीन सरकार आल्यावर धोरणात्मक बदल आणि प्रशासकीय फेरबदल होणे स्वाभाविक आहे. मात्र त्यात पारदर्शकता आणि नैतिकतेचे भान असणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच त्याच अधिकाऱ्यांना सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या पदांवर नेमल्यास हितसंबंधांच्या संघर्षाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे सरकारांनी अशा नियुक्त्यांबाबत काही शिष्टाचार आणि मर्यादा पाळल्या पाहिजेत.

या संपूर्ण प्रकरणात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे राजकीय सोयीचे तत्त्वज्ञान. विरोधात असताना जे चुकीचे वाटते, तेच सत्तेत आल्यानंतर योग्य वाटू लागते. भाजप असो वा काँग्रेस, दोन्ही पक्षांनी आपल्या राजकीय सोयीप्रमाणे भूमिका बदलल्याचे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे भाजप आणि काँग्रेस एकाच माळेचे मणी ही जनमानसातील भावना अधिक दृढ होत चालली आहे. देशातील राजकीय पक्षांनी केवळ विरोधकांवर टीका करण्याऐवजी स्वतःच्या भूमिकेतील सातत्य जपणे आवश्यक आहे. अन्यथा लोकशाहीतील नैतिक अधिष्ठान कमकुवत होईल. राजकीय संघर्ष हा तत्त्वांचा असावा, सोयीच्या भूमिकांचा नव्हे. पश्चिम बंगाल आणि केरळमधील नियुक्त्यांवरील वादाने हेच स्पष्ट केले आहे की, सत्तेच्या राजकारणात तत्त्वांपेक्षा राजकीय लाभाला अधिक महत्त्व दिले जात आहे.

लोकशाहीतील संस्थांवरील विश्वास टिकवायचा असेल, तर सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही स्वतःसाठी वेगळे आणि विरोधकांसाठी वेगळे निकष लावणे थांबवले पाहिजे. अन्यथा चोरबाजारचे आरोप हे फक्त राजकीय घोषवाक्य राहणार नाहीत, तर लोकांच्या मनातील व्यवस्थेविषयीच्या अविश्वासाचे प्रतीक बनतील.

# इंडियन ऑईल पाईपलाईन नोंदीवरून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम ; २८ मे रोजी बैठक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव** : वडाळा महादेव शिवारातून अहिल्यानगरकडे गेलेल्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन कंपनीच्या गॅस पाईपलाईनमुळे शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर इतर हक्कात कंपनीची नोंद करण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजित काळे यांच्या खोकरफाटा येथील निवासस्थानी २८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

वडाळा महादेव येथील शेतकरी बांधवांनी नुकतीच अँड अजित काळे यांची भेट घेऊन कंपनीविरोधात निवेदन दिले. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन कंपनीने नाममात्र मोबदला देत सातबारा उताऱ्यावर इतर हक्काची नोंद करून घेतली आहे. त्यामुळे भविष्यात जमीन व्यवहार, कर्जप्रकरणे तसेच विविध शासकीय कामांसाठी कंपनीची परवानगी घ्यावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या संदर्भात बाधित गावांतील शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन योग्य तोडगा काढण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली असून श्रीरामपूर तालुक्यातील सर्व बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी बाबासाहेब पवार, सुरेश पवार, विश्वास गजाबा पवार, सुदामराव उघडे, प्रभाकर कांबळे, सरपंच सागर मुठे, शरद आसने, संतोष मुठे आदी उपस्थित होते.

# अल निनोच्या अनुषंगाने शेतकरी बांधवानी नियोजन करावे : भोरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** परिसरातील रामपूरवाडी येथे खरीप हंगाम पूर्व बैठकीचे कालआयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषि विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथील प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी मार्गदर्शन करताना सांगितले कि यावेळच्या मान्सूनवर एल निनोचा प्रभाव असण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवानी खरीप हंगामात सोयाबीन, मका, बाजरी ई पिके घेताना प्रामुख्याने मिश्र पिक पध्दत ,आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा जेणेकरून शेतकरी बांधवाना एखादे पिक जरी हातून गेले तरी दुसरे पिक हाती लागेल.सोयाबीन अधिक तूर, कपाशी अधिक मूग किंवा उडीद, बाजरी अधिक तूर यासारख्या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. जमिनीत ओलावा टिकून राहणे करिता पालापाचोळा किंवा प्लास्टिक आच्छादन करावे. पाऊस उघडल्यानंतर शेतात वेळेवर कोळपणी करावी. कमी पावसात आणि कमी कालावधी असणारी पिकांची निवड यंदा फायदेशीर ठरणार आहे. यामध्ये बाजरी, ज्वारी, नाचणी, मूग ,उडीद सोयाबीन हि पिके घेण्याचा प्रयत्न करावा. सोयाबीन कमी कालावधीत येणाऱ्या वाणांची निवड करून बियाणे उगवण चाचणी करूनच पेरणी करावी. पेरणी पूर्वी बीजप्रक्रिया करावी असे आवाहन देशमुख यांनी केले.सोयाबीन व मका एकात्मिक कीड व रोग नियंत्रण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तालुका कृषि अधिकारी आबासाहेब भोरे यांनी एल निनो बाबतीत सविस्तर मार्गदर्शन करून खरीप पिक विमा योजने विषयावर मार्गदर्शन करून शेतकरी बांधवांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. सहाय्यक कृषि अधिकारी किरण धुमाळ यांनी अनुदानित बियाणे या घटकांसाठी अर्ज करण्यासाठी शेतकरी बांधवाना सूचना केली. सदरील प्रसंगी कृषि सहायक राहुल निर्मळ,शिवाजीराव आंबडकर ,प्रकाश शेळके,रामदास रणछोड,सुनिल सांबा, शिवाजी जगताप,ज्ञानदेव सांबारे,बबन बाबरे, सुनिल म्हसे,व इतर मान्यवर उपस्थित होते.

# शासनाच्या प्रयत्नातून व शेतकऱ्यांच्या सहकार्याने चांदा महालक्ष्मी हिवरे शिवरस्ता खूला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथील चांदा ते महालक्ष्मी हिवरे हा शिवरस्ता शासनाच्या प्रयत्नातून व शेतकऱ्यांच्या सहकार्याने खुला करण्यात आला आहे.




गेल्या कित्येक वर्षांपासून पासून चांदा ते महालक्ष्मी हिवरे हा शीव रस्ता बंद होता परंतु शासनाच्या प्रयत्नातून व या परिसरातील शेतकरी बांधवांच्या सहकार्याने हा शिवरस्ता खुला करण्यात आला या वेळेस दोन्ही बाजूचे शेतकरी उपस्थित होते हा रस्ता खुला झाल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना या रस्त्याचा वहिवाटी साठी लाभ होणार आहे सदर शिव रस्ता शासकीय मोजणी विना, समंजस्याने कोणताही पोलीस बंदोबस्त न घेता कुठलेही वाद विवाद न होता हा शिव रस्ता खुला करण्यात आला त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे चांदा व परिसरातून अनेकांनी कौतुक केले व अशाच पध्दतीने इतर ठिकाणचे जे शिव रस्ते बंद आहेत ते खुले होण्यासाठी चांदा महालक्ष्मी हिवरे या शिव रस्त्याच्या शेतकऱ्यांचा आदर्श घेऊन जे बंद पडलेले शिव रस्ते आहेत ते खुले होण्यासाठी सहकार्य केले पाहिजे असे मत यावेळी चांदा मंडल अधिकारी अमृता पडोळे यांनी व्यक्त केले.

यावेळी चांदा मंडल अधिकारी अमृता पडोळे, चांदा ग्राम महसूल अधिकारी संदीप बोरुडे, देडगाव मंडळ अधिकारी सुनील खंडागळे, महालक्ष्मी हिवरे येथील महसूल च्या वर्षा शिंदे , चांदा ग्रामपंचायत सरपंच रावसाहेब दहातोंडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष ॲड. योगेश दहातोंडे, विश्वास दहातोंडे, मोहन राशिनकर, मच्छिंद्र दहातोंडे, दिपक जावळे,वामन आदी शेतकरी या वेळी उपस्थित होते.

# केंद्र शासनाच्या कांदा खरेदी परिपत्रकाची होळी करणार : अँड.पांडुरंग औताडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** केंद्र शासनाने कांद्याचा किमान हमी खरेदी दर (एमएपीप) योजना केवळ नाशिक जिल्हयाच्या पुरती मर्यादित ठेवून राज्यातील इतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्यायकारक भूमिका घेतल्याच्या निषेधार्थ प्रहार सामाजिक संघटनेच्या वतीने दिनांक १ जून २०२६ रोजी नेवासा बाजार समिती समोर केंद्र शासनाच्या कांदा खरेदी परिपत्रकाची होळी आंदोलन करण्यात येणार असल्याचे प्रहारचे युवा जिल्हाध्यक्ष अँड.पांडुरंग औताडे यांनी सांगितले.याबाबत प्रहारच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.




निवेदनात म्हटले आहे की राज्यातील अनेक जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन घेतले जाते. अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी देखील मोठ्या प्रमाणावर कांदा पिकावर अवलंबून आहेत. मात्र केंद्र शासनाने जाहीर केलेली किमान हमी खरेदी दर योजना केवळ नाशिक जिल्ह्यासाठी लागू केल्याने इतर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. शासनाने केवळ एका जिल्ह्यालाच लाभ देणे म्हणजे उर्वरित कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रहार सामाजिक संघटनेच्या वतीने शासनाने सदरचे परिपत्रक तात्काळ मागे घेऊन राज्यातील सर्व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना समान न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच कांद्याला हमीभाव, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारभाव व खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखावी अशीही मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आगामी काळात राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

या निवेदनावर प्रहार सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सांगळे,युवा जिल्हाध्यक्ष अँड.पांडुरंग औताडे, जिल्हा संपर्कप्रमुख बाळासाहेब खर्जुले, जिल्हा संघटक जालिंदर आरगडे, तालुका कार्याध्यक्ष अनिल विधाटे, तालुका उपाध्यक्ष पांडुरंग नवले, युवक जिल्हा उपाध्यक्ष सचिन साबळे, धरणग्रस्त तालुकाप्रमुख नागनाथ आगळे, युवक तालुका प्रमुख विकास कोतकर, शेतकरी संघटक राजेंद्र कळस्कर यांच्यासह विविध पदाधिकारी व कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.

सदर निवेदनाची प्रती केंद्रीय कृषिमंत्री,मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच आमदार बच्चूभाऊ कडू यांना माहितीस्तव पाठविण्यात आली आहे.

# कृषि विद्यापीठाचा खुरासणी संशोधन प्रकल्प उत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** भारतीय तेलबीया संशोधन संस्था, हैद्राबाद येथे ऑनलाईन पध्दतीने तेलबीया वार्षिक आढावा बैठक पार पडली. या बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या इगतपूरी येथील विभागीय कृषि संशोधन केंद्र येथे कार्यरत असलेल्या अखिल भारतीय समन्वीत खुरासणी (कारळा) संशोधन प्रकल्पास उत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यावेळी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (पीक विज्ञान) डॉ. डी.के. यादव, प्रभारी अतिरिक्त महासंचालक (तेलबीया आणि कडधान्य पिके) डॉ. एस.के. झा, हैद्राबाद येथील भारतीय तेलबीया संशोधन संस्थेचे संचालक डॉ. आर.के. माथूर व प्रकल्प संचालक डॉ. आनंद विश्वकर्मा उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके व सहयोगी संशोधन संचालक डॉ. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाने शेतकर्यांसाठी भरीव योगदान दिले आहे.

या केंद्राने आत्तापर्यंत सह्याद्री, फुले कारळा, फुले वैतरणा आणि फुले कळसुबाई हे वाण आणि नऊ तंत्रज्ञान शिफारशी शेतकर्यांसाठी प्रसारीत केल्या आहेत. या प्रकल्पाने दिलेल्या या योगदानाची दखल घेवून सदरचा पुरस्कार मिळाल्याची माहिती प्रकल्पाचे खुरासणी पैदासकार तथा प्रभारी अधिकारी डॉ. दिपक डामसे यांनी दिली.

या प्रकल्पातील प्रवीण लोहकरे तसेच विभागीय कृषि संशोधन केंद्रातील डॉ. अविनाश कोलगे, डॉ. जयपाल चौरे, प्रा. सुरेश परदेशी, प्रा. रंगनाथ बागुल, मिलिंद पाटील, गणेश बहिरम, गजेंद्र फुलपगारे व अमीत वाघ या सर्वांचे सहकार्य मिळाले.

# श्रीरामपूर-पुणे बसच्या इंजिनमध्ये अचानक धूर निघाला, अन् प्रवासी घाबरले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** - आगाराची बस श्रीरामपूर-पुणे ही बस सोमवारी पुण्याकडे जात असताना चास (ता.अहिल्यानगर) येथे तिच्या इंजिनमधून अचानकपणे धूर निघून लागल्याने लेकराबाळांसह प्रवास करणाऱ्या महिला, वृद्ध,ज्येष्ठ नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. सकाळी पावणे अकरा वाजता श्रीरामपूर स्थानकातून निघालेल्या बसमध्ये दुपारी दोन वाजता रणरणत्या उन्हात धूर निघाला. वाहक व चालकाने प्रसंगावधान दाखविल्याने मोठा अनर्थ टळला. चालकाने तारकपूर व श्रीरामपूर आगारास याबाबत कळवून देखील दुसरी बस न आल्याने प्रवाशांना महामार्गावरच कडक उन्हात उभे रहावे लागल्याने




लहान लेकरांसह महिला, ज्येष्ठांचे हाल झाले.अखेर वाहकाने इतर आगाराच्या बस थांबवून पाच,दहा, पाच दहा प्रवाशांना या बसगाड्यांमध्ये बसवून दिल्याने अगोदर संकटात सापडलेल्या प्रवाशांना दिलासा मिळाला. श्रीरामपूर आगारास नवीन लालपरी बस आलेल्या आहेत. विशेष म्हणजे नवीन बस ऐवजी जुन्या नादुरुस्त बस लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी पाठविल्या जात आहेत.नादुरुस्त बस व वेळापत्रकाची 'ऐसी की तैसी' होत असल्याने श्रीरामपूर आगाराच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे नेहमीच हाल होत आहेत.श्रीरामपूर आगाराबाबत प्रावश्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

# जायकवाडी धरणग्रस्तांच्या प्रश्नां संदर्भात डॉ.ढगे यांचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील प्रवरासंगम येथे दि.२६ मे रोजी विठ्ठल मंदिरामध्ये जायकवाडी धरणग्रस्तांच्या प्रश्न संबंधात सांगोपांग चर्चा झाली. जायकवाडी धरणग्रस्त पुनर्वसन होऊन ५२ वर्षे झाली काही प्रश्न सुटले असले तरी नव्याने काही प्रश्न निर्माण झाले आहे. त्या प्रश्नांच्या संदर्भात कृषी शास्त्रज्ञ व माजी कुलगुरू डॉ. अशोक ढगे यांनी सविस्तर निवेदन अप्पर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे यांना दिले.

जमिनीच्या वर्गीकरणाबाबत हिंगे यांनी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांना सूचना देऊन जागेवर अनेक नियम उलगडा करून प्रश्न सोडवण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अशोक ढगे यांनी मच्छीमारांचा प्रश्न मांडून जायकवाडी धरणाच्या पाण्यावर चांगल्या जातीचे मत्स्यबीज सोडावे. तसेच स्मशानभूमीच्या संदर्भात अधिक निधी उपलब्ध करून द्यावा आणि या भागात होत असलेली वृक्षतोडीच्या संदर्भात वनविभागाला गांभीर्याने सूचना कराव्यात धरणग्रस्त गावांना जोडणारी रस्ते तसेच वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी स्वतंत्र सबस्टेशनसाठी महावितरणाला सूचना द्याव्यात अशा प्रश्नांचा उहापोहो डॉ. ढगे यांनी यावेळी बोलतांना केला.

याप्रसंगी अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे,नेवासा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले,जेष्ठ कार्यकर्ते टोका येथील माजी उपसरपंच वसंतराव डावखर, ग्रामपंचायत सदस्य नितीन भालेराव व पंचक्रोशीतील शेतकरी धरणग्रस्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वनपट्टा शेतकऱ्यांना फार्मर आयडी नोंदणी करण्यासाठी कॅम्प

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** राहुरी तालुक्यातील वनपटटा धारक शेतकऱ्यांना फार्मर आयडी नोंदणीसाठी कॅम्प आयोजित करण्यात आला आहे . त्या अनुषंगाने राहुरी तालुक्यातील एकुण २३८ वनपटटा धारक संपूर्ण यादी यामध्ये समवेत जोडलेली सदर यादीतील वनपट्टा धारक यांची फार्मर आयडी नोंदणीसाठी मा जिल्हाधिकारी यांनी धारक कागदपत्रे कॅम्प रोज घेण्यात येणार आहे आशा सुचना देण्यात आल्या आहे . त्यासाठी वनहक्क प्रमाणपत्र, वनपटटा धारक पती पत्नी आधार कार्ड , त्याचे आधार लिंक असलेला मोबाईल व चालू ७/१२ उतारा यांची गरज लागणार आहे . त्यामध्ये ग्राम महसुल अधिकारी यांना आशा सुचना देण्यात आल्या आहे राहुरी तालुक्यातील वनपटटा धारक कॅम्प म्हैसगाव दि २६ मे २०२६ , वावस्थ , व



बारागाव नांदुर २९ मे , २०२६ , चिखलठाण २ मे , ३ मे आशी दोन दिवस दिले आहे . पिंपी अवघड , कोळ्याची वाडी , कोळेवाडी ४ मे , जांभळी , दरडगाव थडी कणगर दोन दिवस दिले आहे ८ मे २०२६ , ९ मे २०२६ तालुक्यातील गावा समोर दिलेल्या तारखेस ग्राम महसुल अधिकारी, तलाठी , उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर किरण सावंत पाटील यांनी दिल्या आहे . आशा स्तरावरून सुचना देण्यात आल्या आहे .

# बालाजी देडगावमध्ये कृषिदुतांचे उत्साहात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय, सोनईच्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी (ठअथए अखअ ) ग्रामीण कृषि जागरुकता कार्यानुभव व कृषि औद्योगिक संलग्नक अंतर्गत देडगाव गावात दाखल झाले असून ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले . या मध्ये कृषिदूत निलेश घोडके ,आर्यन कांबळे, अथर्व मैड, तेजस जायभाय,अनुज जगताप, उदय गाडे यांचा समावेश असून ते शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत.तसेच गावामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे ग्रामीण जीवनमान, सामाजिक व आर्थिक स्तर, नैसर्गिक साधन संपत्ती, समाजातील सामाजिक स्थिती, पीक पद्धती इ. विविध गोष्टींचा अभ्यास करणार आहेत. त्याच बरोबर शेतकऱ्यांनाही विविध कार्यक्रम व प्रात्यक्षिक दाखविणार आहेत . माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, पिकांवर येणारे रोग व किडी याची माहिती व व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन तसेच शेतीशी निगडित विविध समस्यांचे निराकरण,बीज प्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत . कार्यक्रमालाही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे , उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे , कार्यक्रम समन्वयक प्रा.अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. नरेंद्र दहातोंडे ,डॉ. संतोष चौगुले , प्रा. दिशा चव्हाण ,व इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.




या प्रसंगी देडगाव गावचे सरपंच चंद्रकांत मुंगसे, उपसरपंच आनंद दळवी, माजी चेअरमन कडूभाऊ तांबे, माजी उपसरपंच बाळासाहेब मुंगसे, ग्रामविकास अधिकारी संतोष उल्हारे भाऊसाहेब, सहाय्यक कृषि अधिकारी दिपक कंकाळ , अविनाश कदम ,शरद तांबे, पोपट मुंगसे,विश्वास हिवाळे, लक्ष्मण मुंगसे,व इतर गावकऱ्यांनी कृषिदुतांचे स्वागत केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## सुरेशनगर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुरेखा खंडागळे बिनविरोध



**नेवासा** : तालुक्यातील सुरेशनगर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सौ.सुरेखा अशोक खंडागळे यांची ठरलेल्या रोटेशनप्रमाणे बिनविरोध निवड करण्यात आली आहे. लोकनियुक्त सरपंच सौ.शैलाताई कल्याणराव उभेदळ यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामपंचायत चे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची निवड करण्यात आली. यावेळी झालेल्या उपसरपंच पदाच्या निवडीच्या प्रसंगी सुरेखा खंडागळे यांच्या उपसरपंच पदाची सूचना ग्रामपंचायत सदस्य भाकचंद पाडळे यांनी मांडली. त्यास उपस्थित ग्रामपंचायत सदस्य सुवर्णा सतीश क्षीरसागर, मैनाबाई नाथा बाबर, विनोद निकाळजे यांनी हात वर करून अनुमोदन दिले. निवडी प्रसंगी माजी सरपंच भगवानराव दळवी, बबनराव शेटे, अशोक साळुंके, जिजाबा उभेदळ, शिवाजी वाळके, नाथा बाबर, सतीश क्षीरसागर, फिलिप दळवी, अजय बाबर, हर्षद पाटील, प्रसाद पाषाण, अविनाश दळवी, अमोल खंडागळे, आकाश भोसले, सुनील सुरोशे, अक्षय शेगर, जालिंदर खंडागळे, अशोक खंडागळे, अजय पिटेकर, सागर खंडागळे,युवा नेते विजय उभेदळ, सचिन गोरे, ग्रामसेवक राजेंद्र जाधव उपस्थित होते.

## डॉ. पुजा भागवत यांचे एम. डी. (आयुर्वेद) परिक्षेत यश



**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील व शेवगावच्या पी. एम.टी.एस. आयुर्वेद कॉलेजच्या विद्यार्थीनी डॉ. पुजा हेमंत भागवत यांनी वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम. डी.( आयुर्वेद) परिक्षेत प्रथम श्रेणी मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. डॉ. पुजा भागवत यांना महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद व वडील फुलचंद रोकडे, डॉ. हेमंत भागवत यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. पुजा या कुकाणा येथील सेवा निवृत्त सेवा सहकारी संस्थेचे सचिव पोपटराव भागवत यांच्या स्नुषा आहेत. या यशा बद्दल डॉ. पुजा भागवत यांचे कौतुक होत असून कुकाणा व परिसरातील ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## शनिशिंगणापूर ते राहुरी बस सेवा चालू करावी : मागणी

**सोनई** : बऱ्याच वर्षापासून चालू असलेली एसटी महामंडळाची शनिशिंगणापूर मुक्कामी राहुरीकडे पहाटे ६ वाजता सुटणारी शनिशिंगणापूर राहुरी हे मुक्कामी बस बऱ्याच महिन्यापासून बंद झाल्याने प्रवाशांचे अतोनात हाल होत आहे. परिणामी प्रवाशांना खाजगी वाहनाचा सामना करावा लागत आहे. तरी एसटी महामंडळ नेवासा डेपोने तातडीने शनिशिंगणापूर ते राहुरी बस सेवा पूर्व चालू करावी अशी मागणी केली जात आहे.या मार्गावरील मुळा कारखाना सोनई, ब्राह्मणी, उंबरे, कुटुंबा आखाडा,अशा प्रवासाची सुट्ट्या असल्यामुळे संख्या खूप असते ती बस बंद झाल्याने या मार्गावरील प्रवास गैरसोईचा झाला आहे. वारंवार मागणी करूनही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे, परिणामी एसटी महामंडळाला उत्पन्न ऐवजी तोटा सहन करण्यात अधिकारीचा हात असताना देखील हे अधिकारी नुसते पगार घेण्यापुरतेच असल्याचा आरोप प्रवासी वर्गातून केला जात आहे. प्रत्येक बस स्थानकावर तासंतास महिलावर्ग लहान मुले ज्येष्ठ नागरिक व प्रवासी यांना उभे राहावे लागत आहे.नेवासा डेपोच्या कायमच तक्रारी असल्यामुळे उडवा उडावीची उत्तरे देऊन वेळ काढू पणा करतात, गैरसोय दूर करून शनिशिंगणापूर असलेली मुक्कामी ६ वाजता सुटणारी बस सुरु करावी, नं झाल्यास या मार्गांवरील एकही बस जाऊ दिली जाणार नाही, असा संताप महिला वर्गकडून केला जात आहे.

# चोऱ्यांचा ड्रोनशी संबंध नाही

## तरुणांनी ड्रोनचा पाठलाग करू नये : पो.नि. संजय ठेंगे





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा व पंचक्रोशीत गेल्या पंधरा दिवसांपासून रात्रीच्या वेळी फिरणाऱ्या ड्रोनमुळे नागरिकांमध्ये मोठी घबराट पसरली आहे. संबंधित हे ड्रोन चोरी करण्यासाठी रेकी करत असून, त्यांच्यासोबत मोठी टोळी असल्याच्या वेगवेगळ्या प्रकारच्या अफवा या परिसरात पसरल्या आहेत. त्यामुळे शेतमळ्यात राहणारे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. मात्र, या ड्रोनचा आणि चोऱ्यांशी कोणताही संबंध नसून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन राहुरीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी नागरिकांना केले आहे. ड्रोनच्या या घटने संदर्भात सुरुवातीला पोलीस आणि महसूल प्रशासनाकडे कोणतीही अधिकृत माहिती नव्हती.

वाढत्या अफवा आणि नागरिकांच्या तक्रारींनंतर पोलिसांनी रात्रीची गस्त वाढविली. स्वतः पोलिसांनीही या ड्रोनची पाहणी केली, परंतु ठोस माहिती हाती न लागल्याने प्रशासनही चक्रावले होते. मात्र, हा प्रकार रोजच घडत असल्याने अखेर पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी याबाबत अधिकृत खुलासा केला आहे. मध्यरात्री फिरणाऱ्या या ड्रोनबाबत वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधून माहिती घेतली जात असल्याचे निरीक्षक ठेंगे यांनी स्पष्ट केले. या ड्रोनचा सध्या तरी कोणत्याही चोऱ्यांशी संबंध नाही. अनेक स्थानिक तरुण या ड्रोनला पाहताच टोळक्याने त्याचा पाठलाग करतात. हे तरुण पाठलाग करत दुसऱ्या भागात गेल्यास, तेथील स्थानिक लोक त्यांनाच चोरांची टोळी समजून एखादी अनुचित घटना घडण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे तरुणांनी कोणत्याही परिस्थितीत ड्रोनचा पाठलाग करू नये. राहुरीचे तहसीलदार आणि पोलीस प्रशासन वरिष्ठ पातळीवर संपर्कात असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी नागरिकांना केले आहे.

# फुले कृषि विद्यापीठात आंबा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागांतर्गत आंबा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. २ ते ६ जून, २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या शुभहस्ते होणार आहे. प्रशिक्षणामध्ये आंब्यापासून विविध पदार्थ निर्मिती करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना भविष्यात आपला उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वाचे ठरणार आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थींना आंबा प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती ज्यामध्ये आंबा गर साठवणे, कैरी लोणचे व पन्हे, आंबा सरबत, सिरप, स्क्वॅश, आंबा पावडर, आमचूर, जॅम तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्याचबरोबर अन्न सुरक्षितता व मानके कायद्याची माहिती, प्रक्रिया उद्योगाची नोंदणी, उद्योगासाठी लागणारी मशिनरी व त्यांची देखभाल, पदार्थांचे पॅकेजिंग आणि मार्केटिंग, प्रक्रिया उद्योगासाठी शासनाच्या कर्ज योजना, अनुदान यासंबंधीची माहिती दिली जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येणार आहे.

तरी इच्छुकांनी प्रशिक्षणासाठी दि. २८ मे, २०२६ पर्यंत अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाच्या कार्यालयाशी (०२४२६) २४३२५९ तसेच कार्यालय प्रतिनिधी राहुल घुगे ९४२१४३७६९८ यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड यांनी केले आहे.

# अक्षय कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त सात्रळमध्ये क्रिकेटचा महासंग्राम



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे युवा नेतृत्व तथा नवनिर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांच्या वाढदिवसानिमित्त सात्रळ येथे भव्य प्लास्टिक बॉल डे-लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून परिसरात क्रिकेटचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. सात्रळ-तांभेरे रोडवरील म्हसोबा माळ मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेमुळे पुढील सहा दिवस संपूर्ण परिसर क्रिकेटमय होणार आहे. ग्रामीण भागातील युवकांना क्रीडाक्षेत्रात व्यासपीठ उपलब्ध करून देणे, गावागावातील होतकरू क्रिकेटपटूंना संधी मिळवून देणे आणि तरुणांमध्ये क्रीडाभावना वाढीस लावणे या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी परिसरातील संघांकडून मोठा प्रतिसाद मिळत असून प्रथम येणाऱ्या केवळ २४ संघांनाच प्रवेश देण्यात येणार असल्याने सहभागी होण्यासाठी मोठी चुरस निर्माण झाली आहे. स्पर्धेतील सामने अवघ्या पाच षटकांचे असणार असल्याने प्रत्येक चेंडूवर रोमांच निर्माण होणार आहे.

चौकार आणि षटकारांची आतषबाजी अनुभवण्यासाठी क्रिकेटप्रेमी उत्सुक झाले आहेत. डे-लीग पद्धतीने खेळविण्यात येणाऱ्या या स्पर्धेतील सर्व सामने थेट प्रक्षेपणाद्वारे दाखविण्यात येणार असल्याने गावागावातील चाहत्यांना घरबसल्या सामन्यांचा आनंद घेता येणार आहे. स्पर्धेतील विजेत्या संघांसाठी आकर्षक रोख पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाला तब्बल २१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ११ हजार रुपये तर चतुर्थ क्रमांकासाठी ७ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. त्यामुळे या स्पर्धेला प्रतिष्ठेची किनार लाभली असून परिसरातील नामांकित संघांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. उशिरा येणाऱ्या संघांना पाच धावांची पेनल्टी लागू राहणार असून प्रवेश फी भरल्यानंतरच संघ ग्राह्य धरला जाणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. शिस्तबद्ध नियोजन आणि दर्जेदार आयोजनामुळे ही स्पर्धा परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रमेश पलघडमल, तुषार लकारे आणि किरण उचाडे यांनी केले आहे. तसेच भाऊसाहेब पगारे मित्रमंडळ, राजन ब्राम्हणे मित्रमंडळ आणि परिसरातील ग्रामस्थ, युवक व क्रिकेटप्रेमींचे मोठे सहकार्य लाभत आहे. ग्रामीण भागातील तरुणाईला एकत्र आणणारी ही स्पर्धा सात्रळ परिसरासाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

# माका येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री शंकररावजी गडाख पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त, सोमवार दिनांक २५ मे रोजी नेवासा तालुक्यातील माका येथे, एस.एम.बी. टी. हॉस्पिटल व यशवंतराव चव्हाण दंत महाविद्यालय व हॉस्पिटल, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने, माका येथील मंकावती देवी मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिराचे उद्घाटन युवा नेते उदयन गडाख व डॉ. निवेदिता गडाख यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांसाठी शुगर, रक्तदाब, ब्लड ऑक्सिजन, ईसीजी तपासणी तसेच गुडघेदुखी व दातांवरील उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी मेडिसिन, अस्थिरोग, स्त्रीरोग, नेत्र व दंतचिकित्सा विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांची तपासणी करून आवश्यक सल्ला व मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये तपासणी झालेल्या गरजू रुग्णांवर आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. माका, महालक्ष्मी हिवरा, पाचुंदा व परिसरातील अनेक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

समाजोपयोगी उपक्रमाबद्दल उपस्थित ज्येष्ठ नागरिक, तरुण कार्यकर्ते व ग्रामस्थांनी आयोजकांचे मनापासून कौतुक केले. विशेष म्हणजे, शंकरराव गडाख मित्र मंडळ, माका यांच्या वतीने सन २००७ पासून या आरोग्य शिबिराचे सातत्याने आयोजन करण्यात येत असून, ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हा उपक्रम मोठा आधार ठरत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम नागरीकांना, सहकारी सोसायटी, सर्व खाजगी व सरकारी बँका, खाजगी सावकार, व्यक्ती व नातेवाईक यांना कळविणेत येते की, मौजे- सावरगांव पाट ता. अकोले जि. अहिल्यानगर येथील खालील नमुद यांच्या मालकीच्या ताब्यातील व कब्जेवहीवाटीतील शेतजमिन मिळकती आहेत.

| अ. न. | जमिन मालकांचे नाव | सर्व्हे क्र.व गट क्र. | क्षेत्र हेक्टर आर | जमिनीचे एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | शांताबाई दामोधर जाधव<br>रमेश दामोधर जाधव<br>दिलीप दामोधर आढाव<br>कुसुम मारुती उगले<br>(सामाईक क्षेत्र) | ६९० | १.१ | २.७५ |
| २ | बाळासाहेब नारायण जाधव<br>ज्ञानेश्वर नारायण जाधव<br>लताबाई नारायण जाधव<br>(सामाईक क्षेत्र) | ६९० | १.१ | २.७५ |
| ३ | जनाबाई विष्णू जाधव<br>कचरू विष्णू जाधव<br>शरद विष्णू जाधव<br>कमल लक्ष्मण बोडके<br>रंजना विलास सहाने<br>विमल राजेंद्र आरोटे<br>मंगल रामदास कदम<br>(सामाईक क्षेत्र) | ६९१/२ | ३.६४ | ९.१ |
| ४ | प्रशांत आण्णासाहेब जाधव<br>अक्षदा आण्णासाहेब जाधव<br>चंद्रकला आण्णासाहेब जाधव<br>(सामाईक क्षेत्र) | ६९१/२ | ०.८० | २ |
| ५ | शारदा आण्णासाहेब सहाणे | ६९२ | ०.६७ | १.६७५ |
| ६ | दिनकर भास्कर सहाणे | ६९२ | ०.४३ | १.०७५ |
| ७ | ज्ञानदेव भास्कर सहाणे | ६९२ | ०.४२ | १.०५ |
| ८ | भास्कर तुकाराम सहाणे | ६९४ | १.०४ | २.६ |
| ९ | दिनकर भास्कर सहाणे | ६९४ | १.२७ | ३.१७५ |
| १० | शुभम ज्ञानदेव सहाणे | ६९४ | ०.६३ | १.५७५ |
| ११ | ऋषिकेश ज्ञानदेव सहाणे | ६९४ | ०.६४ | १.६ |
| १२ | आण्णासाहेब पाटीलबुवा सहाणे | ६९४ | १.५० | ३.७५ |
| १३ | पंढरीनाथ किसन सहाणे<br>रामदास किसन सहाणे<br>बाळासाहेब किसन सहाणे<br>प्रमिला दत्तात्रय सहाणे<br>नलिनी ज्ञानदेव सहाणे<br>अमित ज्ञानदेव सहाणे<br>अनुश्री भूषण चव्हाण<br>(सामाईक क्षेत्र) | ७०७ | ४.२४ | १०.६ |
| | एकूण | | १७.४८ | ४३.७ |

सदरहू आमचे पक्षकार Ceigall Green Energy MH1 Limited Office A-898, Tagore Nagar, Ludhiana 141001 Punjab यांना भाडेपट्टा कराराने देण्याचे विचारात आहेत. तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही हक्क, कर्ज, हितसंबंध दस्त असल्याचे त्यांनी ही नोटीस जाहीर होताच आठ दिवसांत मुळ दस्तऐवजासह आमचे पक्षकारांना भेटून आमचे व पक्षकाराचे समाधान करावे. त्यानंतर कोणीही काहीही हरकत घेतल्यास किंवा कोणाचा काही दस्त किंवा व्यवहार असल्यास तो आमचे पक्षकार जाहीर नोटीस प्रसिद्ध करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्ध केली असे.

दि.- २७/०५/२०२६.

**जाहीर नोटीस प्रसिद्ध करणाऱ्यांच्या तर्फे,**
**ॲड. योगेश्वर हरिभाऊ पवार**
**पत्ता- पाईपलाईन रोड, श्रीराम चौक, कृष्णा कॉम्पलेक्स, पहिला मजला, शॉप नं- १०६ ता. जि.- अहिल्यानगर पिन- ४१४००१.**
**मो. नं.- ७९७२९४९६७४.**

# हरेगावात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**हरेगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथील संत तेरेजा शैक्षणिक संकुलात संत तेरेजा उच्च माध्यमिक विद्यालयाच्या २००४-०५ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहात पार पडला. संस्थापक ख्रिस्तवासी रे. फा. वसंत सोनवणे यांच्या स्मरणार्थ संत तेरेजा हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत तेरेजा बॉईज हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य बलमे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रजा जागृती शिक्षण संस्थेचे सहसचिव व संत तेरेजा शैक्षणिक संकुलाचे सुपरवायझर रे. फा. फ्रान्सिस ओहळ उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक सचिन शिंगाडे, प्रा. भाऊसाहेब तोरणे, माजी शिक्षक पाळंदे, शामुवेल राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी शिक्षक व माजी विद्यार्थ्यांची मिरवणूक काढून केली. उपस्थित मान्यवरांचा शाल व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांनाही विशेष गौरविण्यात आले. मनोगत व्यक्त करताना प्राचार्य बलमे यांनी शाळेच्या संस्कारांची परंपरा अधोरेखित केली. शाळा ही केवळ इमारत नसून संस्कारांची जागा आहे, असे मत रे. फा. फ्रान्सिस ओहळ यांनी व्यक्त केले. प्रा. तोरणे यांनी संस्थेच्या उभारणीत धर्मगुरू व शिक्षकांचे योगदान स्मरणात ठेवण्याचे आवाहन केले. माजी शिक्षक पाळंदे यांनी महाविद्यालय उभारणीतील संघर्ष आणि शिक्षकांच्या त्यागाच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनीही आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी दिपक नवगिरे, राहुल वाघ आणि विश्वास खरात यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन दिपक नवगिरे यांनी तर प्रास्ताविक विश्वास खरात यांनी केले. आभार प्रदर्शन राहुल वाघ यांनी मानले.

## सायटेशन नोटीस

प्रो.फी.जमा.रु. दि.२५/०५/२०२६
पान नं.
चौ.अ.नं. ३०/२०२६

पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात

**अर्जदार**-शोभा मच्छिंद्र कर्डिले, रा आल्हणवाडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

**सामनेवाला**-ग्रामपंचायत कार्यालय आल्हणवाडी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

सदर अर्जदार हा मौजे आल्हणवाडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथील रहिवाशी आहेत. सदर अर्जदार यांचा सासरे मौजे कै. सुखदेव दामू कर्डिले यांचा मृत्यु मौजे आल्हणवाडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर येथे ०१/०७/२०२० रोजी झालेला आहे. त्यानंतर मृत्यु नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय आल्हणवाडी येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय आल्हणवाडी यांचे कार्यालयात मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे सासरे नामे कै. सुखदेव दामू कर्डिले मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र (मृत्यू दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांच्या सासरे नामे कै. सुखदेव दामू कर्डिले मृत्यू दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय आल्हणवाडी ता. पाथर्डी येथील मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत आल्हणवाडी ता. पाथर्डी येथे जावुन मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता मृत्युची नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत २७/०४/२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय आल्हणवाडी ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थतीमध्ये सदर अर्जदारास त्यांच्या सासरे नामे कै. सुखदेव दामू कर्डिले यांचे मृत्यु नोंद मृत्यु रजिस्टरला होणे न्यायच्या व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदाराचे सदरहु मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक २५/०५/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे

हुकुमावरून

शिक्का

**सही**
**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी पाथर्डी**

# गांडूळ खत प्रकल्पातून घडली कृषी उद्योजकाची यशोगाथा

## सोनगावच्या भीमराज शिंदेंनी दिली सेंद्रिय शेतीला नवी दिशा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : शेतीकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून न पाहता तिला उद्योगाची जोड दिल्यास ग्रामीण भागातील युवकही यशस्वी उद्योजक होऊ शकतात, हे राहुरी तालुक्यातील सोनगाव अनापवाडी येथील युवा कृषी उद्योजक भीमराज राधाकृष्ण शिंदे यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

'भूमीवैभव ग्रोनिक्स' या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी गांडूळ खत निर्मिती व्यवसाय उभारून सेंद्रिय शेतीला नवी ऊर्जा दिली आहे. शिक्षणातून विद्यार्थी हा केवळ नोकरी करणारा नव्हे, तर रोजगार निर्माण करणारा व्हावा या उद्देशाने विविध स्तरावर विशेष प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमांना जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, पायरेन्सच्या कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील, प्रवरा कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम तसेच पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी उद्योजकता अभियान राबविण्यात येत आहे.

प्रवरा संस्थेचे माजी विद्यार्थी असलेल्या भीमराज शिंदे यांनी कृषी पदविका शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढे काय, हा प्रश्न त्यांच्या समोर होता.



मात्र त्यांनी नोकरीचा मार्ग न निवडता कृषी उद्योजकतेची वाट स्वीकारली. बाभळेश्वर येथील कृषी विज्ञान केंद्रात मॅनेज हैदराबाद, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने आयोजित ४५ दिवसांचे ग्री क्लिनिक ग्री बिझनेस प्रशिक्षण पूर्ण करत त्यांनी स्वतःचा उद्योग सुरू करण्याचा निर्णय घेतला.

यातूनच 'भूमीवैभव ग्रोनिक्स'ची निर्मिती झाली. सुरुवातीला गांडूळ खत निर्मितीपासून सुरू झालेल्या या प्रकल्पातून आज व्हर्मीकंपोस्ट, व्हर्मीवॉश आणि व्हर्मीकल्चर यांसारख्या सेंद्रिय उत्पादनांची निर्मिती केली जात आहे. ही उत्पादने परिसरातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत त्यांनी नैसर्गिक शेतीविषयी जनजागृतीचे कामही सुरू केले आहे. या प्रवासात त्यांनी शासकीय योजना, बँक अर्थसहाय्य आणि प्रशिक्षणातून मिळालेल्या तांत्रिक ज्ञानाचा प्रभावी वापर केला. अल्पावधीतच त्यांच्या उत्पादनांना शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळू लागला असून शेतीपूरक उद्योगातून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करता येतात, याचे ते उदाहरण ठरले आहेत.

कृषी विज्ञान केंद्रातील प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, शांताराम सोनवणे, डॉ. विलास घुले, डॉ. प्रियंका खर्डे, सज्जला लांडगे आणि डॉ. विठ्ठल विखे,कैलास लोंढे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करत कौशल्याधारित प्रशिक्षणावर भर दिला. या प्रशिक्षणातूनच व्यवसायाची दिशा मिळाल्याचे भीमराज शिंदे सांगतात. याबाबत बोलताना भीमराज शिंदे म्हणाले, प्रवरेमध्ये शिक्षण घेत असताना आत्मविश्वास मिळाला, तर कृषी विज्ञान केंद्रातील प्रशिक्षणातून व्यवसायाचे तंत्र शिकायला मिळाले. गांडूळ खतासोबतच त्यापासून विविध मूल्यवर्धित उत्पादने तयार करता येतात, हे समजले.

आज ही उत्पादने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत असताना सेंद्रिय शेती आणि भूमातेचे संवर्धन यासाठीही काम करत आहे. ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांच्या मुलांनी केवळ शेती न करता शेतीपूरक उद्योग उभारावेत. कृषी उद्योजकता हीच भविष्यातील दिशा आहे. बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेल्या कृषी उद्योजकता अभियानामुळे अनेक युवक शेतीकडे नव्या दृष्टीने पाहत आहेत. आत्मनिर्भर भारत, नैसर्गिक शेती आणि ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरत असल्याचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### राज्यात इंधनाची ५२ टक्के साठेबाजी!

संध्याकाळी त्या संदर्भात बैठक होणार आहे. कांद्याच्या संदर्भात राज्य आणि केंद्र सरकार चर्चा करत आहे. पंधरा रुपयांची खरेदी आपण सुरू केलेली आहे. शेतकऱ्यांच्या संदर्भात राज्यातलं सरकार संवेदनशील आहे. पण काही लोक विनाकारण याबाबत राजकारण करू इच्छितात.

त्यांना माझं सांगणं आहे की, राज्य आणि केंद्र सरकारने १५ रुपयांनी कांदा खरेदीचा निर्णय केला आहे, तुमच्या काळात कधी असा निर्णय केला होता का ते दाखवा, तो कधीच दिसणार नाही. आम्ही संवेदनशील आहोत म्हणूनच हे करत आहोत. आम्हाला याची कल्पना आहे की, इतके करून भागणार नाही, अनेक गोष्टी कराव्या लागतील, त्यामुळेच केंद्र सरकारसोबत उद्याला बैठक आम्ही घेत आहोत. त्या बैठकीतून दीर्घकालीन उपाययोजना काय करता येतील याचा प्रयत्न केला जाणार आहे. हे शंभर टक्के राजकीय आंदोलन आहे. कांदा कापल्यानंतरही ज्यांच्या डोळ्यात अश्रू येणार नाहीत असे मंडळी आता अश्रू ढाळण्याचा प्रयत्न करत आहेत. पण महायुतीचे सरकार कांद्याच्या संदर्भात संवेदनशीलतेने काम करण्याचा प्रयत्न करत आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

### कांद्याचे आंदोलन पेटले

तुमच्या कांद्याला भाव कसा मिळणार? शरद पवारांनी आम्हाला सांगितले की, रस्त्यावर शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहा. नाफेडमध्ये सत्ताधाऱ्यांचे बगलबच्चे कांदा खरेदी करत आहेत. ८ ते १० लाख टन कांदा खरेदी करा. हा कांदा देशात कुठेही विकायचा नाही. भारताच्या बाहेर कांदा विक्री झाला नाही तर जाळून टाका. एवढे मोठे आंदोलन सुरू आहे. मात्र, सत्ताधारी पक्षाचे नेते कोणाला तिकीट द्यायचे, नगरसेवकांना किती रुपयात विकत घ्यायचे, याचा विचार करत असल्याची चर्चा मुंबईमध्ये सुरू आहे. ६ हजार लोकांना पोलीस प्रशासनाने थांबवले आहे. आंदोलनाला येऊ देत नाही. त्या लोकांना तत्काळ सोडा. सरकार आपल्याला हलक्यात घेत आहे. अजितदादांना या सरकारने न्याय दिला नाही. आम्हाला दुसऱ्या राज्यात जाऊन एफआयआर दाखल करावी लागली. जे अजितदादांना न्याय देत नाही ते आपल्याला कसे देणार? कुंभमेळ्याच्या कामांचे भ्रष्टाचार बाहेर काढणार, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. नाशिकच्या चांदवड येथे कांद्याच्या दरवाढीच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन चिघळल्याचे चित्र पाहायला मिळाले. आंदोलनकर्त्यांनी रस्ता रोको करत वाहनांच्या रांगांकडे धाव घेतल्याने तणाव निर्माण झाला. काही आंदोलकांनी वाहनांची हवा सोडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी आंदोलकांना मज्जाव करताच दोन्ही बाजूंमध्ये झटापट झाली. तब्बल दोन तासांहून अधिक काळ आंदोलन सुरू असून शेतकरी संतप्त झाले आहेत. दरम्यान, पोलिसांनी धरपकड सुरू करत रोहित पवार, शशिकांत शिंदे, अंबादास दानवे आणि हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले आहे. यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्र सरकारवर घणाघाती टीका केली. त्या म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ट्रम्प तात्यांच्या आहारी गेले आहेत. 'ट्रम्प बोले आणि मोदी डोले' अशी सध्याची देशाची अवस्था आहे. अदानींचे कर्ज माफ करणारे हे सरकार शेतकऱ्यांच्या कांद्याला भाव देत नाही, आम्ही या सरकारचा धिक्कार करतो. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याला प्रतिकिलो अवघा सव्वा रुपया दर मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला. नरहरी रांजणगाव येथील शेतकरी लक्ष्मण दुशिंग यांच्या कांद्याला प्रतिक्विंटल अवघे १२५ रुपये, तर इतर शेतकऱ्यांना १३० रुपये दर मिळाला. वाहतुकीचा खर्चही निघत नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी गंगापूर-वैजापूर महामार्गाच्या गेटसमोर सर्व कांदे रस्त्यावर फेकून देत 'रास्ता रोको' केला, ज्यामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती.

### लग्नाच्या स्वप्नांचा सामूहिक चुराडा!

घेतल्यानंतर आयोजकांनी सर्वांना विधी थेट मंडपातच होतील असे सांगत घरगुती हळद-मेहंदीचे कार्यक्रमही करू दिले नव्हते. त्यामुळे कोणालाही संशय आला नाही. पीडित राहुल नावाच्या तरुणाने सांगितले की, आम्हाला दाखवलेले फोटो आणि प्रत्यक्षात घडलेला प्रकार यात जमीन-अस्मानाचा फरक होता. आम्ही मोठ्या आशेने लग्नासाठी आलो होतो; पण शेवटी रिकाम्या मंडपात उभे राहून फसवणूक झाल्याचे समजले. भोपाळहून आलेल्या एका कुटुंबाने तर लग्नासाठी गाड्या भाड्याने केल्या होत्या. नातेवाईकांसमोर मोठी नाचक्की झाल्याने अनेक कुटुंबीय भावनिक झाले. आयोजकांकडून सतत नवरी मुली रस्त्यात आहेत, ट्रॅफिकमध्ये अडकल्या आहेत, अशी थाप दिली जात होती. मात्र मध्यरात्रीपर्यंत कोणीच आले नाही आणि सर्वांचे फोन बंद झाले. घटनेनंतर संतप्त तरुणांनी देवास येथील बँक नोट प्रेस पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत या रॅकेटचा मुख्य सूत्रधार मुकेश आणि त्याच्या पत्नीला अटक केली आहे. आरोपी मूळचे विदिशा जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. या टोळीने इतर राज्यांत किंवा जिल्ह्यांतही अशाच प्रकारे फसवणूक केली आहे का, याचा तपास सुरू असून पोलिसांचे विशेष पथक पुढील चौकशीसाठी रवाना झाले आहे. सामूहिक विवाहाच्या नावाखाली तरुणांच्या भावनांशी खेळणाऱ्या या घटनेने समाजात मोठी खळबळ उडाली आहे.

### अहिल्यानगर विधान परिषदेची जागा भाजप निष्ठावंताला मिळावी...

त्यांनी आपण मागील दाराने येणार नाही, असे सांगितले आहे याकडे राम शिंदे यांनी लक्ष वेधले. राहुरी पोटनिवडणुकीच्या वेळी माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर उमेदवारी अर्ज दाखल केला नाही व भाजपला समर्थन दिले. त्यांनी मुख्यमंत्र्यांचे ऐकले. दोघांमध्ये काय ठरले, हे आता ऐनवेळी कळेलच, असेही राम शिंदे यांनी सांगितले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे संख्याबळ अधिक असल्याने ही जागा भाजपलाच मिळेल, असा दावा करताना त्यांनी भाजपच्या निष्ठवांतांना उमेदवारी देईल, अशी अपेक्षा आहे. परंतु ऐनवेळी वेगळा निर्णय होऊ शकतो असाही दावा केला. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक अपेक्षित आहे. सध्या प्रशासक आहे. परंतु आपण बँकेच्या निवडणुकीत केवळ लक्ष घालणार आहोत असे नाही तर बारकाईने लक्ष घालणार आहोत, असेही सभापती राम शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, गेल्यावर्षी मंत्रिमंडळाची चौंडी येथे बैठक होऊन ६८१ कोटी रुपये खर्चाचा तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास आराखडा मंजूर करण्यात आला. परंतु पूरनियंत्रण रेषेचा अभ्यास करण्यामध्ये वेळ गेला, दिरंगाई झाली तरी आपला पाठपुरावा सुरू आहे. राज्य सरकारही सकारात्मक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चौंडीला जोडणाऱ्या रस्त्यांसाठी ३६० कोटी रुपये मंजूर करण्यात आली. त्याच्या निविदा व कार्यारंभ आदेश दिले गेले आहेत. त्याचे भूमिपूजन करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे परवानगी मागण्यात आली आहे, असेही सभापती राम शिंदे यांनी सांगितले. चौंडी महोत्सवास निवडणूक आयोगाची परवानगी - चौंडी येथे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती महोत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्री पंकजा मुंडे, शिवेंद्रराजे भोसले, अतुल सावे दत्ता भरणे आदी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे. आदल्या दिवशी ३० मे रोजी कुमार विश्वास यांचे कवी संमेलन व प्रवचन तसेच ड्रोन शो व फटाक्यांचे आतषबाजी होणार आहे.

### केंद्र सरकार कांदा, साखर उत्पादकांना दिलासा देणार

इथेनॉलच्या खरेदी दरातही अपेक्षित वाढ झाली नाही. इथेनॉल प्रकल्प आणि प्रकल्पाच्या विस्तारीकरणाला देण्यात येणाऱ्या व्याज सवलत, अनुदानेही १७. ११ कोटी रखडले आहेत. या सर्व विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे. दरम्यान, संपूर्ण देशाच्या खरीप हंगामाची आढावा बैठक केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीत होणार आहे. ही बैठक दोन दिवस चालणार असून, बैठकीला विविध राज्यांचे कृषिमंत्री आणि संबंधित वरीष्ठ अधिकारी उपस्थितीत राहणार आहेत. कांदा प्रश्न केंद्र सरकारच्या कोर्टात- राज्यात कांदा दराचा प्रश्न चिघळला आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याला एक रुपये, सव्वा रुपये प्रति किलो दर मिळत आहे. कांदा दराच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे.

# पुणतांबाच्या ऐतिहासिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाटाच्या विकासासाठी निधी द्या !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : धार्मिक, पौराणिक व ऐतिहासिक वारसा लाभलेले आणि दक्षिण काशी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पुणतांबा येथील गोदावरी नदीकाठावरील ऐतिहासिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घाटाच्या संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी तातडीने निधी देण्याची मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



आमदार आशुतोष काळे यांनी निवेदनात पुढे असे नमूद केले आहे कि, पुणतांबा हे तीर्थक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान असून गोदावरी नदीकाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेला अहिल्या घाट हा या परिसराच्या वैभवाचा आणि अस्मितेचा ऐतिहासिक ठेवा आहे. हा घाट प्राचीन स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना मानला जात असून या घाटावर २६ भव्य दगडी पायऱ्या, आकर्षक गोलाकार बुरूज, प्राचीन महादेव मंदिर, कार्तिकस्वामी मंदिर आणि संत चांगदेव महाराज समाधी परिसर यांसारखी महत्त्वाची धार्मिक व पवित्र स्थळे आहेत. या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारशामुळे तसेच वर्षभरात अनेक विविध धार्मिक कार्यक्रम होत असल्याने राज्यभरातून हजारो भाविक, अभ्यासक आणि पर्यटक या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत असतात.परंतु, काळाच्या ओघात आणि योग्य देखभालीअभावी सध्या या ऐतिहासिक घाटाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. घाटाचे जुने दगडी बांधकाम आता झिजत चालले असून अनेक ठिकाणी भिंतींना व पायऱ्यांना मोठे तडे गेले आहेत. घाटावर येणाऱ्या भाविक आणि पर्यटकांच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक असलेल्या संरक्षण भिंत आणि कठड्यांचा येथे मोठा अभाव जाणवतो आहे. याशिवाय घाटाच्या परिसरात स्वच्छता, रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाश व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय, ऐतिहासिक माहिती देणारे फलक आणि एकूणच सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीशी आणि लोककल्याणाच्या कार्याशी निगडित असलेल्या या ऐतिहासिक वास्तूचे मूळ वैभव टिकवणे आणि तिचे संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. गोदावरी नदी काठावरील या ऐतिहासिक अहिल्यादेवी होळकर घाटाचा कायापालट करण्यासाठी, इतिहास संवर्धनासाठी आणि भाविकांसह पर्यटकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी देण्याची मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली असून त्यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी सांगितले आहे.

# बेकायदेशीर ड्रोनविरोधात कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी तालुका व परिसरात रात्रीच्या वेळी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या बेकायदेशीर ड्रोनमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर या ड्रोन हालचालींबाबत गंभीर चिंता व्यक्त करत देवळाली प्रवरा नगर परिषदेचे नगराध्यक्ष सत्यजित पाटील कदम, आंतरराष्ट्रीय खेळाडू आप्पासाहेब ढूस आणि पत्रकार शिवाजी घाडगे यांनी मंगळवारी (दि. २६) जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांची संयुक्त भेट घेत कारवाईची मागणी केली.शिष्टमंडळाने राहुरी तालुक्यात रात्री अपरात्री आकाशात घिरट्या घालणाऱ्या ड्रोनमुळे ग्रामस्थांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचे निदर्शनास आणून दिले. काही भागांमध्ये चोरीच्या घटनांपूर्वी ड्रोन दिसल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकारांची तातडीने चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत जिल्हा पोलीस प्रशासनाला तात्काळ आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. अवैध ड्रोन शोधण्यासाठी अँटी ड्रोन गनचा वापर करून कारवाई करण्यात यावी, तसेच रात्रीच्या गस्तीत वाढ करून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. दरम्यान, प्रशासनाने अवैध ड्रोन उडविणाऱ्यांविरोधात कठोर भूमिका घेतल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. संशयास्पद ड्रोन अथवा हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# राहात्यातील गळवंती मार्गावरील अतिक्रमण हटवले

## नगराध्यक्ष डॉ. गाडेकर यांचा धाडसी निर्णय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : गेल्या अनेक वर्षांपासून राहाता शहरातील प्रमुख रस्ते अतिक्रमण झाल्याने दळणवळणास अडथळा निर्माण झाला होता झालेले अतिक्रमण हटवण्यासाठी राहाता नगर परिषद चे नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर यांनी धाडसी निर्णय घेत गळवंती मार्ग मोकळा केला आहे . नगर परिषद चे अतिक्रमण हटाव पथक दाखल होताच येथील काही नागरीक जमा झाले.

यावरून थोड्याफार प्रमाणात नाराजी दिसली मात्र प्रशासनाचे ठोस भूमिकेमुळे सदर अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले.

राहाता शहरातील प्रमुख गल्ली मध्ये स्थानिक रहिवाशांनी अतिक्रमण करून ओटे पायऱ्या आदी आक्रमण केले होते. यामुळे शहरातील अनेक कार्यक्रमा वेळी होणारी गर्दीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत होता. याचा फटका सण उत्सवाच्या वेळी होणाऱ्या मिरवणूका मधे होणाऱ्या गर्दीचे नियोजन करण्यास ग्रामस्था सह प्रशासनाला मोठी कसरत करावी लागत होती.

या सगळ्यात जास्त फटका राहात्याचे ग्राम दैवत विरभद्र महाराज यांच्या यात्रेवेळी बसत होता. यात्रेमधे गळवंतीचा रथ व त्या सोबत असणारी गर्दीला मार्ग काढणे अवघड होऊन बसले होते.त्यामुळे सदर मार्ग अतिक्रमण मुक्त व्हावा अशी नागरीकांची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबीत होती अखेर नगर पालीका प्रशासनाने ठोस पावले उचलत सदर मार्ग अतिक्रमण मुक्त केले आहे. या मोहीमेचे राहातेकरांनी स्वागत केले असून नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर यांच्या मुत्सद्दीपणाचे कौतूक केले आहे.

# श्री संकट मोचन हनुमान मूर्तीला १५१ किलो आंबे अर्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : अधिक मासाचे पावित्र्य व शुभ महिना पाहता येथील शहराच्या मध्यभागी असलेले तसेच शहर व तालुक्यातील सर्व भक्त - भाविकांचे आराध्य दैवत असलेले श्री संकट मोचन हनुमान मंदिरातील मूर्ती समोर अधिक मास (पुरुषोत्तम महिना)चे मांगल्य जाणत पुरोहित चंद्रकांत कुलकर्णी यांच्या उपस्थितीत १५१ किलोचे आंबे सोमवार (ता, २५) रोजी मूर्तीला अर्पण करण्यात आले. सध्या या मंदिराचे अयोध्येच्या श्रीराम मंदिर समकक्ष बांधकाम चालू आहे. अत्यंत विधिवत पुरोहित चंद्रकांत कुलकर्णी यांनी हा विधी सम्पन्न केला. या प्रसंगी भक्त परिवार उपस्थित होता.




# अखेर विकासवाडी, अटकमळा, गणेशवाडी येथे वीजपुरवठा सुरळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चास ( ता . आंबेगाव )** : परिसरातील विकासवाडी, अटकमळा व गणेशवाडी येथे अवकाळी पावसामुळे वीजेचे खांब कोसळून अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पाणीपुरवठा, विहिरींच्या मोटारी तसेच दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले होते. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर स्थानिकांनी अनेकदा महावितरणकडे पाठपुरावा केला, मात्र सुरुवातीला याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये होती. अखेर येथील शेतकरी व ग्रामस्थांनी ही समस्या भीमाशंकर कारखान्याचे माजी चेअरमन देवदत्त निकम तसेच जिल्हा परिषद सदस्या प्रीती थोरात यांच्यासमोर मांडली.देवदत्त निकम व प्रीती थोरात यांनी तातडीने महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नागरिकांच्या अडचणी दूर करण्याबाबत सूचना केल्या. त्यांच्या पाठपुराव्यानंतर महावितरण प्रशासनाने दखल घेत युद्धपातळीवर दुरुस्तीची कामे हाती घेतली. दरम्यान, पडलेले वीजखांब उभारून वीजवाहिन्यांची दुरुस्ती करण्यात आली असून संबंधित वाड्यांमधील वीजपुरवठा अखेर सुरळीत करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत लोकप्रतिनिधी व महावितरण कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# ज्ञानेश्वर कारखाना निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप

## उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा

नेवासा : लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना (भेंडे, ता. नेवासा) च्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा अचानक झाल्याने आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप करत, भाजप किसान मोर्चाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष संघर्ष योद्धे अंकुश रंगनाथ काळे यांनी प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांच्याकडे पत्राद्वारे तीव्र आक्षेप नोंदवला आहे. न्याय न मिळाल्यास संभाजीनगर उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे

संघर्ष योद्धे अंकुशराव काळे यांनी प्रामुख्याने केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणे निवडणूक केंद्र बदलण्याची मागणी: सध्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय 'ज्ञानेश्वर कामगार कल्याण केंद्र, भेंडे कारखाना' येथे ठेवण्यात आले आहे. या ठिकाणी विद्यमान संचालक मंडळाकडून गैरप्रकार होण्याची आणि मतदारांवर दहशत निर्माण केली जाण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे लोकशाही मार्गाने आणि पारदर्शक पद्धतीने निवडणूक होण्यासाठी हे केंद्र 'सहाय्यक निबंधक कार्यालय, नेवासा' येथे हलवण्यात यावे.

प्रत्येक गटामध्ये मतदान केंद्र द्या: ज्ञानेश्वर कारखान्याचे कार्यक्षेत्र २१४ गावांचे असून सभासदांची संख्या मोठी आहे. मतदारांना प्रवासाचा त्रास होऊ नये व मतदानाचा हक्क सुलभतेने बजावता यावा, यासाठी राज्यातील इतर सहकारी कारखान्यांप्रमाणेच या निवडणुकीतही प्रत्येक गटामध्ये (नेपश) स्वतंत्र मतदान केंद्र देण्यात यावे.

या मागण्यांची तात्काळ दखल घेऊन प्रशासनाने ऊस उत्पादक सभासदांना न्याय द्यावा, अशी मागणी काळे पाटील यांनी केली आहे.




# मोफत महाआरोग्य शिबीरात १८ हजार ६३१ जणांचा सहभाग

**गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : मानव सेवेचे महामंदिर साकारत असताना रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद अंगीकारून कार्यरत असलेल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे विविध १३७ प्रकारच्या विविध तपासण्या करीत आयोजित मोफत महाआरोग्य शिबीरात १८ हजार ६३१ जणांची तपासणी व उपचार करण्यात आले. पुणे शहरासह राज्याच्या विविध भागातून आलेल्या रुग्णांच्या विविध तपासण्या करीत साहित्य व औषधे वाटप देखील करण्यात आले. याकरिता पुणे जिल्ह्यातील ९० रुग्णालये व संस्थांच्या प्रतिनिधींनी शिबीरात अखंड ९ तास सेवा दिली.




श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील नू.म.वि. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.रघुनाथ माशेलकर आणि आमदार हेमंत रासने यांच्या हस्ते झाले. यावेळी कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाच्या डॉ. अंजली टिळेकर, डॉ.संजीव डोळे, डॉ. संदेश पटवर्धन, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, यतिश रासने, सौरभ रायकर, राजाभाऊ चव्हाण, राजाभाऊ पायमोडे, राजाभाऊ घोडके, विलास रासकर, अमोल चव्हाण यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. ट्रस्टतर्फे फिरता दवाखान्याचे लोकार्पणही यावेळी मान्यवरांच्या हस्ते झाले. ट्रस्टचे वैद्यकीय विभाग प्रमुख राजेंद्र परदेशी व सहकाऱ्यांनी शिबीराच्या नियोजनात विशेष सहभाग घेतला.

डॉ.रघुनाथ माशेलकर म्हणाले, प्रत्येकाच्या आरोग्याची चाचणी होणे आवश्यक आहे. या चाचण्या योग्य वेळेत झाल्या तर नंतरचे दुष्परिणाम टाळता येतील. विकसित, संतुलित, समृद्ध, सुविद्य, सक्षम भारत व्हावा, यासाठी अशा शिबिरांच्या माध्यमातून व रुग्णसेवेच्या माध्यमातून ट्रस्टचे सुरु असलेले काम आशादायी आहे. आमदार हेमंत रासने म्हणाले, विकसित भारत घडविण्याकरिता प्रत्येक नागरिक निरोगी असणे गरजेचे आहे. नागरिकांनी निरोगी राहावे, यादृष्टीने ट्रस्टतर्फे आरोग्य सेवा दिली जाते. यंदा महा आरोग्य शिबीराचे दुसरे वर्ष आहे. यामाध्यमातून हजारो शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून अनेक उपचार मोफत करण्यात आले आहेत. यापुढेही हे रुग्णसेवेचे कार्य सातत्याने सुरु राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. महाआरोग्य शिबीराकरिता सुमारे १५ हजार नागरिकांनी नोंदणी केली होती. शिबीरात हृदय आजार, किडनी, नेत्र आजार, दंत उपचार, स्त्री रोग, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, अपंगांना मोफत जयपूर फूट वाटप, रक्त तपासणी, रक्तदान शिबीर, ईएनटी, आयुर्वेदिक, होमिओपॅथी उपचार, अस्थिरोग, विविध थेरपी, रेडिओलॉजी, श्रवण आणि स्पीच थेरपी हे उपचार विनामूल्य करून देण्यात आले. तसेच महाराष्ट्र शासन आरोग्य विभाग व पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा, याची माहिती देखील देण्यात आली. वर्षभरात ट्रस्टशी संलग्न विविध २२३ रुग्णालये आणि विविध संस्थांमधून आरोग्यसेवा दिली जात आहे. जय गणेश विद्यार्थी पालकत्व योजनेतील विद्यार्थ्यांना मोफत आरोग्य शिबीर व विविध शाळांमध्ये आरोग्य शिबीराच्या माध्यमातून देखील ही सेवा दिली जाते.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FARIDA PARVIN ABDUL HAKK (LEAVING CERTIFICATE) TO NEW NAME AS FARIDA JALAL PATEL (AADHAR NO.2254 3385 9310) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 26/05/2026

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि .२७ मे २०२६**

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९ ४८० ६६० | २-३ | १२० ६७० ५८० | जोड २६-०३-४१-७९-३५ |

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १६७ ३५८ ३३८ | ४-१ | १३७ १४६ १०० | जोड ४६-२१-३७-९८-१५ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२८ २९० २२७ | १-० | १४५ २३५ ५५० | जोड १२-६९-३०-७५-०४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

## द•ख•ल

### तोफखाना परिसरात तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला, आरोपीविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** शहरातील तोफखाना परिसरातील सातभाई गल्लीत गाडी धुण्याच्या क्षुल्लक कारणावरून एका तरुणावर लोखंडी रॉड आणि धारदार शस्त्राने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपी चेतन मोडक याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शुभम भाऊसाहेब थोरात याने फिर्याद दिली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी शुभम थोरात आणि त्याचा मित्र प्रणय नवनाथ तुपे हे दोघे घरामागे मोटारसायकल धुण्याचे काम करत होते. त्याच वेळी तिथे राहणारा त्यांचा ओळखीचा तरुण चेतन मोडक हा दुचाकीवरून तिथे आला. त्याने माझी देखील दुचाकी धुवून दे असे शुभमला सांगितले. शुभम दुचाकीवर पाणी मारत असताना अचानक चेतनच्या अंगावर पाण्याचे काही थेंब उडाले. याच गोष्टीचा प्रचंड राग मनात धरून चेतन याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्याने चेतनने लोखंडी रॉड आणून शुभम आणि त्याचा मित्र प्रणय याला बेदम मारहाण केली. या हल्ल्यात शुभमच्या दोन्ही हाताला दुखापत झाली, तर मित्र प्रणय याच्या उजव्या कानाला धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी करण्यात आले. आरोपीने जाताना पुन्हा या गल्लीत आल्यास बघून घेण्याची धमकी दिली. जखमींना उपचारासाठी तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलीस हवालदार संतोष गर्जे करत आहेत.

### उपोषणाचा राग मनात धरून एकाला मारहाण चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अहिल्यानगर :** उपोषणाला बसू नको, असे म्हणून चौघांनी एका ५६ वर्षीय व्यक्तीला अडवून शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना पिंपळगाव माळवी शिवारात घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाऊसाहेब दशरथ काळे (वय ५६, रा. उंबरे, ता. राहुरी) यांनी याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी सुनील आप्पासाहेब दुर्सिंग, अनिल सुखदेव दुर्सिंग, बबलू राजेंद्र ढोकणे आणि प्रवीण भास्कर शिरसाठ (सर्व रा. उंबरे, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी भाऊसाहेब काळे हे आपल्या दुचाकीवरून वांबोरी रस्त्याने अहिल्यानगरकडे जात होते. ते पिंपळगाव माळवी गावच्या शिवारात आले असता, आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवले. 'तू उपोषणाला बसू नको' असे म्हणून त्यांनी काळे यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावर काळे यांनी 'मी तुमच्याविरुद्ध उपोषणाला बसणारच आहे' असे उत्तर दिले. याचा तीव्र राग मनात धरून सुनील दुर्सिंग याने हातातील एका टनक वस्तूने काळे यांच्या उजव्या गालावर मारून त्यांना जखमी केले. तसेच 'जर तू उपोषणाला बसला तर तुला जीवे मारून टाकू' अशी धमकी दिली. आरोपींनी फिर्यादीचा भ्रमणध्वनी हिसकावून जमिनीवर फेकून दिला आणि त्याचे नुकसान केले. या घटनेनंतर काळे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पुढील तपास साहाय्यक फौजदार महंमद शेख करत आहेत.

### नगरमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा


**अहिल्यानगर :** येथील प्रतिबिंब संस्थेच्या वतीने व अहिल्यानगर जिल्हा ब्युटीपार्लर असोसिएशनच्या सहकार्याने दि १० जून रोजी



नगरमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा(नववधू मेकअप स्पर्धा) ब्युटिशियन साठी घेण्यात येणार आहे,स्पर्धाचे हे ४ थे वर्षे आहे. स्टेशनरोड येथील यश ग्रँड हॉटेल येथे १० जून ला दुपारी १२ वा आयोजित करण्यात आली आहे विजेत्या ब्युटिशियनला बेस्ट ब्युटिशन ऑफ ब्रायडल हा पुरस्कार देण्यात येणार आहे यामध्ये एकूण ३ क्रमांक काढण्यात येणार आहेत. स्पर्धकांनी कोणत्याही प्रकारची,जातीची,धर्माची नववधु बनवता येईल त्यासाठी मेकअपला १ तासाचा वेळ देण्यात येईल,कोणीही या स्पर्धेत भाग घेऊ शकते,ब्युटिशन आपल्याबरोबर एक असिस्टंट ठेवू शकते.सहभागी ब्युटिशनला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. ज्यांना या स्पर्धेत भाग घ्यायचा आहे त्यांनी प्रतिबिंब संस्था,स्टेट बँके समोर ,दिल्लीगेट,अहिल्यानगर मोबाईल ९२८४९३०६७४ किंवा अनुजा कांबळे ९८५०२६२५९५, सायली मेहता ८०८७२२६२४६ वर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी पोलीसांचा जुगार अड्ड्यावर छापा

**अहिल्यानगर :** पोलीस अधीक्षक सोमणाथ सुदर्शन यांनी शहरात काही ठिकाणी अवैध जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार स.पो.नि. जगदीश मुलगिरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दि. २४ व २५ मे या कालावधीत उपनगरातील वेगवेगळ्या ५ ठिकाणी छापे टाकून कल्याण मटका नावाचा अवैध जुगार चालवणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई केली. या कारवाईत पाईपलाईन रोड, एका हिरदगं शेजारी आरोपी शशिकांत चंदर शिंदे, नितीन बाबाजी शिंदे, नागेश चंदर शिंदे यांना अटक करून ४,००० रोख, ३ मोबाईल व जुगार साहित्य असा १४,००० चा मुद्देमाल जप्त. तसेच केडगाव, एकवीरा चौक आरोपी गोविंद पारधे याला अटक करून ३,४५० रोख व साहित्य असा ४,४०० चा मुद्देमाल जप्त. यश नगर, कामगार नाका: आरोपी इस्माईल याच्याकडून ४,४०० रोख जप्त. जुगाराचे साहित्य जागेवर जाळण्यात आले. वांगीपाल रोड, मोरया मंगल कार्यालयासमोर आरोपी महेश रामदास लोखंडे व संकेत शहराव बर्डे यांना अटक. २,६५० रोख, ७,००० किमतीचे कापडी रोप्स, ३३ चिट्ट्या व इतर साहित्य असा १६,२५० चा मुद्देमाल जप्त. पाथर्डी रोड आरोपी प्रकाश जिवाजी गुंजाळ, राज.गजान कोल्हे, एम.आय.डी.सी. यांना अटक. २,९०० रोख व साहित्य असा २,९०० चा मुद्देमाल जप्त. वरील सर्व कारवाईमध्ये एकूण १,४९,३७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सर्व आरोपींविरुद्ध तोफखाना पोलीस स्टेशन, येथे महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२(अ) व इतर कलमांन्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरेस यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्प पोलीस स्टेशनचे स.पो.नि. जगदीश मुलगिरे, पोलीस अंमलदार रेवननाथ दहीफळे, मिसाळ, विलास गारकल, शाहिद शेख, दिलीप शिंदे, धननाथ पालवे, बापू झरके, प्रमोद लहारे यांच्या पथकाने केली. अहिल्यानगर पोलीस अवैध धंद्यांविरुद्ध अशाच प्रकारे धडक कारवाई सुरू ठेवणार असून, नागरिकांनी अशा प्रकारांची माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक यांनी केले आहे.



# अखेर तांत्रिक कर्मचाऱ्यांना औद्योगिक न्यायालयाकडून न्याय

## सात वर्षांच्या लढ्यानंतर अन्यायकारक दंड रद्द; पगारातून कपात केलेली रक्कम परत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर : सर्कलमधील तांत्रिक कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने केलेली अन्यायकारक दंडात्मक कारवाई अखेर औद्योगिक न्यायालयाने चुकीची ठरवत संबंधित कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. तब्बल सात वर्षांच्या कायदेशीर लढ्यानंतर औद्योगिक न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निकाल देत पगारातून कपात करण्यात आलेली दंडाची रक्कम परत करण्याचे आदेश प्रशासनाला दिले. तांत्रिक कामगार युनियन ५०५९ महाराष्ट्र राज्य यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा ऐतिहासिक विजय मिळाल्याची भावना कामगारांमधून व्यक्त होत आहे.**

सन २०१७ मध्ये अहिल्यानगर सर्कलमध्ये सुरक्षा साधनांच्या अभावामुळे तांत्रिक कर्मचारी आंदोलन करत होते. काम करताना आवश्यक असलेली सुरक्षा साधने उपलब्ध करून द्यावीत, अशी कर्मचाऱ्यांची मागणी होती. त्यावेळी प्रशासनाने सुरक्षा साधनांचा साठा उपलब्ध नसल्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, ग्रामीण विभागाच्या स्टोअरमध्ये मोठ्या प्रमाणात सुरक्षा साधने शिल्लक असल्याची माहिती काही कर्मचाऱ्यांना मिळाल्यानंतर त्यांनी संबंधित स्टोअरला भेट देऊन पाहणी केली. या पाहणीत मोठ्या प्रमाणात सुरक्षा साहित्य उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाल्याने कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

या घटनेदरम्यान स्टोअर इंचार्ज सहाय्यक अभियंता श्री. भरत पवार व उपकार्यकारी अभियंता श्री. साळुंखे यांच्यासोबत कर्मचाऱ्यांचे शाब्दिक वाद झाले. मात्र, कर्मचाऱ्यांची बाजू समजून घेण्याऐवजी प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यांवरच कारवाईचा बडगा उगारला. सत्य परिस्थिती समोर आणणाऱ्या कर्मचाऱ्यांवर प्रत्येकी ५१ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. या निर्णयामुळे कामगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.



प्रशासनाने दंडाची वसुली संबंधित कर्मचाऱ्यांच्या पगारातून सुरू केली होती. वर्ग-३ कर्मचारी श्री. शंकर बबन जारकड यांच्या वेतनातून दोन टप्प्यांत २५ हजार ५०० रुपयांची कपात करण्यात आली. तसेच वर्ग-४ कर्मचारी श्री. शंकर दीपाजी चव्हाण, श्री. संतोष केशव शेलार, श्री. अमोल गोरक्षनाथ गरूडकर आणि श्री. प्रवीण ज्ञानदेव जठार यांच्या वेतनातून प्रत्येकी १७ हजार रुपयांची कपात करण्यात आली होती. आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कर्मचाऱ्यांवर ही कारवाई अन्यायकारक असल्याची भावना संघटनेकडून व्यक्त करण्यात आली होती.

या अन्यायाविरोधात तांत्रिक कामगार युनियन ५०५९ महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून केंद्रीय उपाध्यक्ष श्री. सतीश दादा भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली संबंधित कर्मचाऱ्यांनी औद्योगिक न्यायालयात धाव घेतली. २०१८ ते २०२५ या कालावधीत या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. अखेर औद्योगिक न्यायालयाने संबंधित तांत्रिक कर्मचाऱ्यांची कोणतीही चूक नसल्याचे स्पष्ट करत प्रशासनाची दंडात्मक कारवाई चुकीची ठरवली. तसेच पगारातून वसूल करण्यात आलेली रक्कम तात्काळ परत करण्याचे आदेश दिले.

औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानुसार मागील दोन महिन्यांत संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात कपात करण्यात आलेली दंडाची रक्कम पुन्हा जमा करण्यात आली. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर पैसे पुन्हा खात्यात जमा झाल्याने दंडात्मक कारवाई झालेल्या कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून आला.

# पोटगीच्या हक्कासाठी महिलेचे मुलासह उपोषण

## 'कोर्टाच्या वॉरंटची अंमलबजावणी होत नाही' सोनई पोलिसांवर महिलेचे गंभीर आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** न्यायालयाने मंजूर केलेल्या पोटगीच्या वॉरंटची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करत रुपाली गोरक्षनाथ डोळे या महिलेने आपल्या लहान मुलासह जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू केले. सोनई पोलीस स्टेशनमधील काही पोलिस कर्मचारी जाणीवपूर्वक पतीला संरक्षण देत असून न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी टाळत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी निवेदनातून केला आहे.

रुपाली डोळे या मूळच्या नेवासा तालुक्यातील वंजारवाडी येथील असून सध्या त्या पाथर्डी तालुक्यातील चिंचोडी शिराळ येथे वास्तव्यास आहेत. त्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पती गोरक्षनाथ आसाराम डोळे यांनी त्यांना नांदविण्यास नकार देत मारहाण केली तसेच विष पाजून जीव घेण्याचाही प्रयत्न केला होता. त्यानंतर त्यांनी स्वतःसह मुलगा शिवम गोरक्षनाथ डोळे याच्या उदरनिर्वाहासाठी पाथर्डी न्यायालयात अन्न-वस्त्र पोटगीसाठी क्रिमिनल अर्ज क्रमांक २२/२०२४ दाखल केला होता.

या प्रकरणात न्यायालयाने रुपाली डोळे व त्यांच्या मुलासाठी दरमहा चार हजार रुपयांची पोटगी मंजूर केली. मात्र पती गोरक्षनाथ डोळे यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार पोटगीची रक्कम भरली नाही तसेच न्यायालयातही हजर राहिले नाहीत. त्यामुळे न्यायालयाने त्यांच्या विरोधात १ लाख २१ हजार रुपयांच्या वसुलीसाठी वॉरंट काढले. हे वॉरंट बजावणीसाठी सोनई पोलीस स्टेशनकडे पाठविण्यात आले होते.

मात्र संबंधित पोलिस कर्मचारी वॉरंटची अंमलबजावणी करत



नसल्याचा आरोप रुपाली डोळे यांनी केला आहे. वंजारवाडी बिटचे हेड कॉन्स्टेबल राख, पवार व कासार हे जाणीवपूर्वक कारवाई टाळत असून हेड कॉन्स्टेबल राख हे गोरक्षनाथ डोळे यांचे नातेवाईक असल्याने खोटे अहवाल न्यायालयात सादर केले जात असल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला आहे.

महिलेने आणखी गंभीर आरोप करताना सांगितले की, वॉरंट बजावणीसाठी हेड कॉन्स्टेबल यांना पैसे दिले. मात्र तरी देखील ते उडवाउडवीचे उत्तर देत आहे. रुपाली डोळे यांनी पुढे म्हटले आहे की, पोटगीची वसुली टाळण्यासाठी गोरक्षनाथ डोळे यांनी आपल्या नावावरील वंजारवाडी येथील गट क्रमांक १६० मधील ४१ आर जमीन पुतण्याच्या नावावर बोगस खरेदीखताद्वारे वर्ग केली. ही मालमत्ता जप्त होऊ नये आणि पोटगीची वसुली टाळता यावी, यासाठी हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तसेच गोरक्षनाथ डोळे हे प्रत्यक्षात वंजारवाडी येथे राहत असतानाही पोलिसांकडून तो गावात राहत नाही असे खोटे अहवाल दिले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. वॉरंट आल्याची माहिती मिळताच पोलिसांकडून त्यांना नातेवाईकांकडे पळून जाण्याचा सल्ला दिला जात असल्याने कारवाई होत नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

# नगर-जामखेड रस्त्यावर व्यापाऱ्याला लुटले

**अहिल्यानगर :** नगर-जामखेड रस्त्यावरील वृंदावन मंगल कार्यालयासमोर पहाटेच्या सुमारास एका कोळसा व्यापाऱ्याला अडवून शिवीगाळ व मारहाण करत लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी विजय बंडू लालघोडे (वय ४८, रा. कुसगाव, मावळ, सध्या रा. कुई, सोलापूर) हे शेती आणि कोळसा विक्रीचा व्यवसाय करतात. घटनेच्या दिवशी पहाटे पावणेचार वाजेच्या सुमारास ते नगर-जामखेड रस्त्यावरून पिकअप जीपमधून जात होते. यावेळी निंबोडी परिसरात वृंदावन मंगल कार्यालयासमोर आरोपी महादेव (पूर्ण नाव माहीत नाही) आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीला रस्त्यात अडवले.

आरोपींनी जुन्या वादातून किंवा पैशांच्या कारणावरून फिर्यादी विजय लालघोडे यांना बेदम मारहाण केली. आरोपींनी त्यांना रस्त्यावर गाठून शिवीगाळ व दमदाटी करत चापटीने मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या जवळील ५४ हजार ४७० रुपये किमतीचा २ हजार ९५ किलो तयार कोळसा, २५ हजार रुपयांची रोख रक्कम आणि गळ्यातील १५ हजार रुपये किमतीची १० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन असा एकूण ९४ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने काढून घेतला आणि आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलिसांनी तातडीने पावले उचलली. घटनेचे गांभीर्य ओळखून तपास पथकासह श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून, या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार पुढील तपास करत आहेत.

# दारूसाठी पैसे न दिल्याने तरूणाला मारहाण

**अहिल्यानगर :** घरून आपल्या निवासस्थानी जात असलेल्या एका तरुणाला रस्त्यात अडवून दारू व जेवणासाठी पैशांची मागणी करण्यात आली. पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी तरुणाला डोक्यात मारून गंभीर जखमी केले, तसेच बेल्टने आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संदीप देवलाल प्रसाद (वय २८, रा. कातोरे वस्ती, अहिल्यानगर) हे आपल्या घरी जात होते. दरम्यान, म्हस्के कॉलेजजवळील रस्त्यावर निखिल चंद्रकांत बोरकर (रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर), यश सुनील धांग (रा. पितळे कॉलनी, एमआयडीसी) आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना रस्त्यात अडवले. आरोपींनी फिर्यादीकडे दारू पिण्यासाठी आणि जेवणासाठी पैशांची मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला. या रागातून आरोपी निखिल याने फिर्यादीच्या डोक्यात मारून त्यांना जखमी केले आणि 'तुझ्याकडे पाहून घेतो' अशी धमकी दिली. तर दुसरा आरोपी यश याने स्वतःच्या कमरेचा बेल्ट काढून फिर्यादीच्या डाव्या हाताच्या खांद्यावर आणि बोटांवर जबर मारहाण केली. यावेळी सोबत असलेल्या इतर दोन अनोळखी साथीदारांनी फिर्यादीला अद्वातद्वा शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी करत आहेत.



### गुरुवारी साजरी होणार बकरी ईद

**अहिल्यानगर :** शहरात गुरुवारी (दि.२८ मे) ईद उल अज्हा (बकरी ईद) मुस्लिम बांधवांच्या वतीने साजरा होणार आहे. सकाळी ९:३० वाजता ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज अदा केली जाणार आहे. सर्व मुस्लिम बांधवांनी वेळेत पोहचून ईदची नमाज अदा करण्याचे आवाहन अहमदनगर यतीमखाना हिलाल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे. बकरी ईदच्या काळात शहरात कुठेही गोवंश किंवा गोहत्या तसेच प्राणी संरक्षण होणार आहे. अशा सुचना पोलिस प्रशसनाच्या वतिने शांतता समितीच्या बैठकीत देण्यात आल्या आहेत.

# सुनिल सकट यांचा पीएचडी निमित्त सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सामाजिक, पर्यावरण आणि वंचित घटकांसाठी सातत्याने कार्य करणारे भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस सुनिल सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.



दिल्ली येथील 'मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन'च्या वतीने नुकतीच त्यांना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे.

शिर्डी येथे आयोजित भाजपच्या प्रशिक्षण वर्गात हा सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमात विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुनिल सकट यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, मुकुल गंधे, ॲड. देवेंद्र बंब, सावेडी मंडलाध्यक्ष ॲड. कुणाल वाणे, अंशुमन वाणे आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाजपचा सर्वसामान्य कार्यकर्ता समाजसेवेच्या माध्यमातून स्वतः ची वेगळी ओळख निर्माण करीत असल्याचे सांगितले. सामाजिक बांधिलकी जपत राजकारणात कार्य करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. सुनिल सकट यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजकार्याचा ध्यास सोडला नाही, याचे विशेष कौतुक करत त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सुनिल सकट यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत. गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी विविध कार्यक्रम राबविले आहेत. या माध्यमातून त्यांनी समाजात वेगळी छाप निर्माण केली आहे.

# शिवसैनिकांना जाणीवपूर्वक अडकविण्याचा कट?

## शिवसेनेच्या शिष्टमंडळाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांचे नाव वापरून खोटा बनाव रचत गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे. शहरात शिवसैनिकांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून त्यांच्यावर दबाव आणण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (दि. २६ मे) जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेत निवेदन दिले.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती तपासली जाईल तसेच विनाकारण कोणालाही त्रास दिला जाणार नाही, असे आश्वासन दिले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम, जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, दिलीप सातपुते, विक्रम राठोड, नगरसेवक दत्तात्रय कावरे, अभिषेक भोसले आदी उपस्थित होते.

योगेश चंद्रकांत गलांडे हे सावेडी गाव येथील संघर्ष चौक परिसरात वास्तव्यास असून नवनागापूर येथे त्यांचे कार्यालय आहे. ते स्वराज्य कामगार संघटनेचे सचिव तसेच युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून कंपन्या व कामगार यांच्यात समन्वय साधण्याचे काम ते करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गलांडे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, एमआयडीसी परिसरात कंत्राटदार म्हणून काम करणारा चिरंजीव दत्तात्रय गाढवे हा विविध कंपन्यांतील अधिकारी व सुपरवायझर यांना धमकावून त्रास देत असून, त्याच्यावर खंडणी व धमकावण्याचे गुन्हे दाखल आहेत. दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी सनफार्मा चौकात गाढवे याने गाडी आडवी घालत रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप गलांडे यांनी केला असून त्याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक ९५८/२०२५ दाखल करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे.

त्यानंतर गाढवे याने न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. जामिनाला विरोध करू नये यासाठी धमक्या देण्यात आल्याने एनसी क्रमांक ११२/२०२६ दाखल करण्यात आल्याचे निवेदनात नमूद आहे. तसेच न्यायालयाने



जामीन मंजूर केल्यानंतर त्याने अटींचे पालन न केल्यामुळे त्याच्याविरोधात जामीन रद्द करण्यासाठी अर्ज दाखल करण्यात आला होता.

याच पार्श्वभूमीवर स्वतःवरील गुन्हे मागे घेण्यासाठी गाढवे हा सातत्याने खोट्या घटना सांगून गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप गलांडे यांनी केला आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये कथित घटनांबाबत कोणतीही सत्यता आढळून न आल्याने कारवाई झाली नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

निवेदनात म्हटले आहे की, दि. १७ मे २०२६ रोजी तोफखाना पोलीस स्टेशन येथे देखील खोटा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामध्ये त्यांच्यासह मुलगा, पुतण्या, भाऊ आणि शंकर शेळके यांना गोवण्याचा प्रयत्न झाला. मात्र कथित घटनेच्या वेळी संबंधित सर्वजण घरी असल्याचे सीसीटीव्ही फुटेज व अन्य पुरावे पोलिसांकडे सादर करण्यात आले आहेत.

तसेच दि. २४ मे रोजी घडलेल्या घटनेतही आपला किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यांचा कोणताही संबंध नसताना मुद्दाम नाव घेतल्याचा आरोप गलांडे यांनी केला आहे. हा संपूर्ण प्रकार ब्लॅकमेल करण्यासाठी तसेच स्वतःविरोधातील गुन्हे मागे घेण्यासाठी रचला गेल्याचा आरोप त्यांनी केला आहे. शिवसेनेच्या शिष्टमंडळाने या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून सत्य समोर आणण्याची मागणी केली आहे.

द•ख•ल

## होळ येथे साहित्यिकांचा सन्मान सोहळा संपन्न

**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील होळ सदोबाची वाडी येथे भाग्यलक्ष्मी सोशल फाउंडेशन व पंचक्रोशी प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पाठ्यपुस्तकातील साहित्यिकांचा सन्मान सोहळा आणि कवी संमेलन कार्यक्रम मोठ्या थाटात संपन्न झाला. आयोजित कवी संमेलनात कवींनी सामाजिक, ग्रामीण, शैक्षणिक आणि भावनिक विषयांवर कविता सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. उपस्थित मान्यवरांचा सत्कार ट्राफिक गुलाबपुष्प देत करण्यात आला. बारामतीतील होळ सदोबाचीवाडी पाठ्यपुस्तकातील साहित्यिकांचा सन्मान सोहळा आणि कविसंमेलन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवर. विभागाचे विशेष अधिकारी मोगल जाधव, बालभारती इंग्रजी विभागाचे विशेष अधिकारी संतोष पवार, ज्येष्ठ साहित्यिका प्रतिमा इंगोले, सागर वायाळ, संभाजी होळकर, सचिन ठोंबरे,बाळासाहेब कर्चे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माधुरी सोनवलकर, अलका रसाळ, कांतीका वसेकर, बाळकृष्ण बाचल, राहुल शिंदे यांचे सहकार्य लाभले.



## मंचर बाजार समितीत कांद्याचे लिलाव बंद; शेतकरी आक्रमक

**मंचर** : कांद्याला मिळत असलेल्या कवडीमोल दरामुळे संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आज मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांद्याचे लिलाव बंद पाडले. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. कांद्याच्या घसरत्या दरामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. बाजार समितीत मोठ्या संख्येने जमलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी लिलाव प्रक्रिया थांबवत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. कांद्याला हमीभाव द्या, शेतकऱ्यांची लूट बंद करा अशा घोषणा देत आंदोलकांनी सरकार आणि बाजार समिती प्रशासनाचा निषेध केला. यावेळी देवदत्त निकम यांनी आक्रमक भूमिका घेत, कांद्याला जोपर्यंत हमीभाव मिळत नाही, तोपर्यंत एकही लिलाव होऊ देणार नाही. तसेच मंत्र्यांना पुणे जिल्ह्यात फिरू देणार नाही, असा इशारा दिला. या आंदोलनात जिल्हा परिषद सदस्य प्रीती थोरात, शेतकरी संघटनेचे सचिन थोरवे, माऊली ढोमे, विशाल वाबळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष धोंडीभाऊ भोर, माजी सरपंच गणेश यादव, सुरज वाजगे यांच्यासह मोठ्या संख्येने कांदा उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. आंदोलन करताना निलाव बंद पाडला



## दोन सरकारी टँकरवर पाबळ-कान्हूर मेसाईची तहान

**पाबळ** : शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील पाबळ आणि कान्हूर मेसाई परिसराला दरवर्षी तीव्र उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. चालू वर्षीही परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून, ग्रामस्थांची तहान भागवण्यासाठी सध्या प्रशासनाकडून दोन सरकारी टँकर सुरू करण्यात आले आहेत. मात्र, दिवसेंदिवस वाढणाऱ्या उष्णतेमुळे हे सरकारी टँकर अपुरे पडत असून, गावाला कायमस्वरूपी टँकरमुक्त करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. दरवर्षी उन्हाळा आला की केवळ तात्पुरती मलमपट्टी म्हणून सरकारी टँकर सुरू केले जातात. प्रशासन या टँकरच्या फेऱ्यांवर दरवर्षी मोठा खर्च करते, परंतु मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. परिसरातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती करणे, जलसंधारणाची कामे वेगाने करणे आणि जवळच्या कालव्यामधून बंद पाईपलाईनद्वारे पाणी आणणे यासारखे शाश्वत उपाय योजावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे

**सध्याची भीषण परिस्थिती**
दोन सरकारी टँकरवर भार: परिसराची मोठी लोकसंख्या पाहता प्रशासनाने मंजूर केलेले दोन सरकारी टँकर अपुरे पडत आहेत. त्यामुळे पाण्यासाठी नागरिकांची मोठी धावपळ होत आहे.
जलस्रोत कोरडे: गावातील सार्वजनिक विहिरी, कूपनलिका आणि इतर स्थानिक जलस्रोत पूर्णपणे कोरडे पडले आहेत.
तासनतास प्रतीक्षा: सरकारी टँकर गावात आल्यानंतर पाणी मिळवण्यासाठी महिलांना उन्हातान्हात तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे.



# पुरंदर तालुक्यात मोफत वैरण बियाणे योजनेसाठी शेतकऱ्यांची झुंबड

## अर्ज भरण्यास अवघे ५ दिवस शिल्लक!

### २१ मे पासून सुरु झालेल्या योजनेचा शेवटचा टप्पा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सासवड** : पंचायत समिती पुरंदर आणि पुणे जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत सुरू असलेल्या १०० टक्के अनुदानावरील वैरण बियाणे पुरवठा योजनेला तालुक्यातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. २१ मे पासून सुरू झालेली ही अर्ज प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली असून, अर्ज जमा करण्यासाठी अवघे ५ दिवस शिल्लक राहिले आहेत. रविवार, ३१ मे २०२६ ही अर्ज करण्याची अंतिम तारीख असल्याने पुरंदर तालुक्यातील सासवड, जेजुरी, परिंचे, नीरा यांसह ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये सध्या शेतकऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

**खरीप हंगामापूर्वी चाऱ्याचे आगाऊ नियोजन**
दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला पशुपालकांना जनावरांच्या ओल्या चाऱ्यासाठी भटकंती करावी लागते किंवा महागडे बियाणे विकत घ्यावे लागते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून पुरंदर पंचायत समितीने खरीप हंगामाच्या तोंडावरच ही योजना युद्धपातळीवर राबवण्यास सुरुवात केली आहे. मोफत मिळणाऱ्या या वैरण बियाण्यांमुळे तालुक्यातील दुग्धव्यवसायाला मोठी चालना मिळणार असून, शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होणार आहे.

**''पशुसंवर्धन अधिकाऱ्यांचे थेट आवाहन''**
''पुरंदर तालुक्यातील प्रत्येक पात्र पशुपालकांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे. ऐनवेळी होणारी धावपळ

**३१ मे नंतर पशुपालकांना लाभ मिळणे कठीण**

टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ मे या अंतिम तारखेची वाट न पाहता, तातडीने आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन मूळ सातबाऱ्यासह अर्ज जमा करावा. तालुक्यातील एकाही गरजू शेतकऱ्याची ही सुवर्णसंधी हुकणार नाही याची काळजी घ्यावी.''
- डॉ.अस्मिता सताळकर (तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी, पंचायत समिती पुरंदर)

''शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची चेकलिस्ट''
''''अंतिम तारीख: ३१ मे २०२६
''''अर्ज जमा करण्याचे ठिकाण: आपल्या परिसरातील जवळचा शासकीय पशुवैद्यकीय दवाखाना. ''''लागणारी कागदपत्रे: १. आधार कार्ड झेरॉक्स. रेशन कार्ड झेरॉक्स ३. सातबारा (७/१२) उतारा (फक्त मूळ प्रत / ओरिजनल) ''स्थानिक स्तरावर तात्काळ मंजुरीची प्रक्रिया'' शेतकऱ्यांना सासवड येथील पंचायत समितीच्या मुख्य कार्यालयात फेऱ्या माराव्या लागू नयेत, म्हणून गावोगावच्या शासकीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना (पशुवैद्यकीय डॉक्टर) स्थानिक पातळीवरच अर्ज स्वीकारून त्याची छाननी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ वाचत असून संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुटसुटीत झाली आहे. या योजनेच्या अधिकृत अपडेट्ससाठी पशुपालक https://www.punezp.gov.in/ या संकेतस्थळालाही भेट देऊ शकतात.




पुरंदर तालुक्यात मोफत वैरण बियाणे योजनेची जनजागृती: पंचायत समिती पुरंदर आणि पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने सन २०२६-२७ या वर्षासाठी राबविण्यात येत असलेल्या १००% अनुदानित वैरण बियाणे वाटप योजनेचे माहितीपत्रक. ३१ मे पर्यंत जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पत्रकारांनी बदलत्या शैलीचा अभ्यास करणे गरजेचे : माजी आ. संभाजी कुंजीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस** : पत्रकारिता क्षेत्रात नवनवे बदल होत असून पत्रकारांनी त्या नव्या शैलीचा अभ्यास करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन पुरंदर हवेलीचे माजी आमदार संभाजी कुंजीर यांनी केले आहे. पुरंदरचे सुपुत्र जेष्ठ पत्रकार चंद्रकांत तथा काकासाहेब पुरंदरे यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या काकासाहेब पुरंदरे पत्रकारिता पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून कुंजीर बोलत होते.सासवड येथील आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान साहित्य परिषद सासवड शाखा व पुरंदरे कुटुंबिय यांच्या वतीने सासवड येथील अत्रे प्रतिष्ठानच्या आवारात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे जिल्हा पत्रकार संघांचे अध्यक्ष सुनील लोणकर यांना या वर्षीचा हा पुरस्कार जेष्ठ विधीतज्ञ अँड अण्णासाहेब खाडे यांच्या हस्ते देण्यात आला. साहित्य परिषदेचे अध्यक्ष अँड दिलीप निरगुडे, जिल्हा परिषद सदस्य रुपाली झेंडे, पंचायत समिती सदस्य अर्चना कटके, स्मिता निगडे व काकासाहेब पुरंदरे यांच्या कन्या आरती सदावर्ते तसेंच कौशिक पुरंदरे इत्यादी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रारंभी आरती सदावर्ते यांनी प्रास्तविकातून काकासाहेब पुरंदरे यांच्या अनेक आठवणींना उजाळा देत त्यांना अभिप्रेत असणारी परखड पत्रकारिता सध्याच्या पत्रकारांनी स्वीकारावी असे आवाहन केले. दिलीप निरगुडे यांनी स्वागतपर मनोगत मांडले भोर गटशिक्षण अधिकारी सचिन लोखंडे, माऊलीं घारे, शब्बीर शेख यांनी यावेळी आपली मनोगते व्यक्त केली. सुनील लोणकर यांनी या पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सत्काराला उत्तर दिले.अण्णासाहेब खाडे यांनी अध्यक्षीय भाषण केले सन्मान पत्राचे वाचन शांताराम पोमण यांनी केले. सचिन घोलप यांनी सूत्रसंचालन तर बंडूकाका जगताप यांनी आभार मानले.



## आळंदी संस्थानने चोरी प्रकरणाचे अहवाल मागवले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी** : श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरातील स्वयंसेवक विशाल वारूळे याच्या संशयास्पद प्रकारानंतर संस्थान कमिटीने कठोर भूमिका घेत मंदिर प्रशासनात व्यापक बदलांची घोषणा केली आहे. सीसीटीव्ही तपासणीत कॅश विभागातून हार, फुले व प्लास्टिकचे पोते नेत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर विशाल वारूळे याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप यांनी सांगितले. संस्थानच्या सीसीटीव्ही विभागातील कर्मचारी श्रीकांत लवांदे यांनी मागील आठवड्याचे फुटेज तपासत असताना १२, १३ व १६ मे रोजी वारूळे याच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. त्यानंतर संस्थान प्रशासनाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिमा नरके यांच्याशी संपर्क साधून पुढील कारवाई केली. या घटनेनंतर अन्नदान व कॅश विभागात स्वयंसेवकांना बंदी घालण्यात आली असून कर्मचारी, सुरक्षा रक्षक व सेवेकऱ्यांसाठी गणवेश व ओळखपत्र सक्तीचे करण्यात आले आहे. मंदिरात प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र तपासणी व्यवस्था लागू करण्यात आली असून पिशव्या आणण्यासही मनाई करण्यात आली आहे. दानपेटी उघडण्यापासून रोकड मोजणीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया आता सीसीटीव्ही व व्हिडिओ शूटिंगच्या देखरेखीखाली होणार आहे. फेस आयडी, थम्ब आयडी आणि आरएफआयडी प्रणालीसह कॅश विभाग पूर्णतः बंदिस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मंदिर प्रशासन अधिक पारदर्शक करण्यासाठी अत्याधुनिक ईआरपी सॉफ्टवेअर व एआय तंत्रज्ञान लागू करण्याची प्रक्रियाही सुरू आहे. दरम्यान, २५ मे रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत प्रशासन सहव्यवस्थापक सागर वाळके, रोखपाल महेश गोखले, अन्नदान कक्षाचे पांडुरंग कुटे तसेच प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांच्याकडून खुलासा व अहवाल मागविण्यात आला आहे. तसेच रोखपाल महेश गोखले यांची बदली अन्नदान कक्षात करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यावेळी प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख राजेंद्र उमाप, पुरुषोत्तम महाराज पाटील, चैतन्य महाराज लोंढे तसेच ग्रामस्थ प्रतिनिधी म्हणून डि. डि.भोसले, नंदकुमार कुऱ्हाडे, विलास घुंडरे, रामभाऊ भोसले, संजय घुंडरे आणि सचिन गिलबिले उपस्थित होते. विशाल वारूळे प्रकरणातील पोलिस तपासाचा पाठपुरावा सुरू असून दोषींना पाठीशी घातले जाणार नाही, अशी भूमिका संस्थान प्रशासनाने स्पष्ट केली आहे.



## कर्तव्य बजावताना वायरमनचा मृत्यू



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर** : आंबेगाव तालुक्यातील गिरवली येथे महावितरणमध्ये वायरमन म्हणून कार्यरत असलेले विक्रम भालेराव यांचा कर्तव्यावर असताना विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवार दिनांक २५ रोजी सायंकाळी सहा ते सव्वा सहा वाजल्याच्या दरम्यान घडली आहे. या घटनेमुळे गिरवली परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गिरवली गावात एका शेतकऱ्याच्या कृषी पंपाचे कनेक्शन नादुरुस्त झाले होते याबाबत संबंधित शेतकऱ्याने वायरमन भालेराव यांना माहिती दिली होती त्यानंतर भालेराव हे सदर वीज कनेक्शन दुरुस्त करण्यासाठी गावातील स्मशानभूमी जवळील डीपीवरील फ्यूज काढून विजेच्या पोलवर चढले होते. त्यावेळी अचानक विजेचा धक्का बसून विजेच्या पोलवरच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दरम्यान वायरमेन भालेराव हे पोलवर चढले असताना त्याचवेळी कोणीतरी अनावधानाने ते फ्यूज पुन्हा बसवल्याने

अचानक विद्युतप्रवाह सुरू झाल्याने विक्रम भालेराव यांना जोरदार विजेचा धक्का बसला आणि त्यांचा विजेच्या खांबावरच जागीच मृत्यू झाला अशी चर्चा गावात सुरू आहे. मात्र याबाबत खात्रीशीर माहिती मिळाली नसुन याबाबत महावितरणचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी महावितरण विद्युत निरीक्षक कार्यालय या ठिकाणी येऊन संपूर्ण पाहणी करून अहवाल तयार केल्यानंतर सदर वायरमेन यांचा मृत्यू कशामुळे झाला आहे हे कळेल व त्यानंतरच संबंधित घटनेबाबत योग्य ती कारवाई केली जाईल असे सांगण्यात आले. घटना समजताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. सहकाऱ्यांसह ग्रामस्थांनी तीव्र हळहळ व्यक्त केली.


विक्रम भालेराव हे मूळ नायगाव तालुका नायगाव जिल्हा नांदेड येथील रहिवासी असून त्यांच्या पश्चात पत्नी, दहा वर्षांचा मुलगा आणि नऊ वर्षांचा मुलगी असा परिवार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अचानक निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर महावितरणच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित केले जात असून कामाच्या ठिकाणी अधिक दक्षता घेण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# शिरूर शहरात नगर परिषदेचा 'बुलडोझर'

## ९० हून अधिक अतिक्रमणे जमीनदोस्त!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाबळ** : शहरातील मुख्य रस्त्यांसह गल्लीबोळांतील वाहतुकीला मोठा अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत अतिक्रमणांवर अखेर आज शिरूर नगर परिषदेचा 'बुलडोझर' फिरला. नगर परिषद प्रशासनाने एकाच वेळी तीन वेगवेगळ्या पथकांद्वारे शहरात धडक मोहीम राबवली. या धडक कारवाईत रस्त्याच्या कडेला असलेल्या सुमारे ९० हून अधिक बेकायदेशीर टपऱ्या, तात्पुरती शेड, आणि पत्र्याच्या भिंती तोडून जागा पूर्णपणे मोकळी करण्यात आली. तीन पथकांद्वारे एकाच वेळी कारवाईगेल्या अनेक दिवसांपासून शहरातील मुख्य बाजारपेठ आणि चौकांमध्ये अतिक्रमणांमुळे नागरिक व वाहनधारकांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर नगर परिषदेने पूर्वतयारी करून आज दुपारपासूनच शहरात कारवाईला सुरुवात केली. कोणतीही हयगय न करता प्रशासनाने जेसीबीच्या साहाय्याने अनधिकृत बांधकामे हटवण्यास सुरुवात केली. नगरपरिषदेचा हातोडा बरसत असताना काही भागात स्थानिक दुकानदार आणि अतिक्रमणधारकांनी या कारवाईला तीव्र विरोध दर्शवला, ज्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, प्रशासनाने आधीच चोख पोलीस बंदोबस्त तैनात ठेवल्यामुळे पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि मोहीम अखंडपणे सुरू ठेवली.नगर परिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले की, यापूर्वी संबंधित अतिक्रमणधारकांना स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्याबाबत नोटिसा व पूर्वकल्पना देण्यात आली होती.



परंतु, मुदतीत अतिक्रमण न हटवल्यामुळे अखेर ही कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. यापुढे शहरात पुन्हा कोणीही रस्त्यावर बेकायदेशीरपणे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कडक दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा प्रशासनाने दिला आहे.या धडक मोहिमेमुळे गेल्या अनेक महिन्यांपासून कोंडलेल्या शिरूरच्या मुख्य रस्त्यांनी अखेर मोकळा श्वास घेतला असून, सामान्य नागरिकांमधून या कारवाईचे स्वागत होत आहे.

## शासकीय नोकरीच्या आमिषाने कोट्यवधींची फसवणूक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती:** शासकीय नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत तरुण-तरुणींसह अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या भामट्यांच्या टोळीवर बारामती तालुका पोलिसांनी मोठी कारवाई करत आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. बनावट नियुक्तीपत्रे देऊन तब्बल १ कोटी ३६ लाख ९० हजार रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.

या प्रकरणी सूरज तिमय्या असदकर (वय ३९ वर्षे )धंदा डिलिव्हरी बॉय (रा:पडवळ अळी गोखले हॉल जवळ चिंचवड गाव तालुका हवेली जिल्हा पुणे) ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२३ ते ४ मे २०२५ या कालावधीत तांदुळवाडी (ता.बारामती) येथील महिला हॉस्पिटल तसेच मळद परिसरात आरोपी



अनिकेत धनंजय पाठक याने 'गट-क अधिपरिचारिका' पदावर शासकीय नोकरी लावून देतो, असे आमिष दाखवत महिला हॉस्पिटलमधील स्टाफ नर्स व इतरांची ओळख करून घेतली. त्यानंतर अजिंक्य पाठक, सिओना साळवे उर्फ सिओना अनिकेत पाठक, सुधाकर सोळंकी, सागर गायकवाड आणि सुरज असदकर यांच्या मदतीने फिर्यादी व साक्षीदारांकडून वेळोवेळी ऑनलाईन तसेच रोख स्वरूपात तब्बल १ कोटी ३६ लाख ९० हजार रुपये उकळण्यात आले. विशेष म्हणजे, विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी बनावट नियुक्तीपत्रेही दिली. मात्र प्रत्यक्षात कोणतीही नोकरी मिळाली नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर फसवणुकीचा प्रकार उघड झाला. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस स्टेशनमध्ये मार्च २०२६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू असताना पोलिसांना माहिती मिळाली की आरोपी सुरज तिमयया असदकर हा चिंचवडगाव येथील घरी पत्नीला भेटण्यासाठी येणार आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आर्थिक फायद्यासाठी संगनमताने गुन्हा केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीस ६ दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली. यापूर्वी अजिंक्य पाठक राहणार दौंड आणि सुधाकर सोळंकी राहणार येरवडा यांना अटक करण्यात आली आहे ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पवार यांच्यासह पोलीस अंमलदार सागर देशमाने जितेंद्र शिंदे विठ्ठल तरंगे यांनी ही कारवाई केली. पुढील तपास सुरू आहे.

## रांजणीच्या खडकवाडीत केबल चोरट्यांचा धुमाकूळ

### ५५ हून अधिक शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वळती** : आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावातील खडकवाडी परिसरात अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या वीज पंपांच्या केबल चोरी करू न मोठा धुमाकूळ घातला आहे. या घटनेत पन्नासहून अधिक शेतकऱ्यांच्या विद्युत पंपांच्या केबल लंपास करण्यात आल्या असून सुमारे सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मीना नदी पात्रातील नरसिंह बंधाऱ्याजवळ जवळपास ५५ हून अधिक शेतकऱ्यांचे वीज पंप आहेत. खडकवाडी परिसरातील शेतकऱ्यांनी पंपांसाठी टाकलेल्या केबल सोमवारी (दि. २५) रात्री अज्ञात चोरट्यांनी कापून नेल्या. चोरट्यांनी मीना नदी पात्राच्या पलीकडे केबलचे आवरण जाळून त्यातील तांब्याच्या तारा लंपास केल्याचे निदर्शनास आले आहे.

मंगळवारी सकाळी शेतकरी नेहमीप्रमाणे वीज पंप सुरू करण्यासाठी गेले असता हा प्रकार उघडकीस आला. अनेक ठिकाणी केबल कापलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

विशेष म्हणजे, गेल्या सहा महिन्यांतील ही दुसरी मोठी चोरीची घटना आहे. यापूर्वीही अशाच प्रकारे केबल चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र त्या प्रकरणातील चोरट्यांचा अद्याप शोध लागलेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे



वातावरण आहे. वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी भयभीत झाले आहेत.

सध्या शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटातून जात आहेत. त्यातच अवकाळी पावसामुळे अनेक पिकांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत केबल चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

संबंधित चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी तसेच ग्रामीण भागात रात्रीच्या गस्तीत वाढ करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

दखल

## गोमातेला राष्ट्रीय पशू घोषित करण्याची मागणी; मुस्लिम समाजाचा पुढाकार



**पाथर्डी :** आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक भान जपत समाजात शांतता, बंधुता आणि परस्पर आदराची भावना अधिक दृढ व्हावी या उद्देशाने पाथर्डी तालुक्यात यापुढे कुठेही गोमाता व गोवंशाची कत्तल होणार नाही. असा प्रकार झाल्यास त्याला मुस्लिम समाज कधीही पाठीशी घालणार नाही. पाथर्डी तालुका मुस्लिम समाजाच्यावतीने गोमातेला राष्ट्रीय पशू घोषित करण्यात यावे. या प्रमुख मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन दिले. विविध समाजघटकांमध्ये सलोखा निर्माण करण्याच्या दृष्टीने मुस्लिम समाजाने घेतलेल्या या पुढाकाराची शहरात चर्चा होत आहे. यावेळी पाथर्डी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नासीर शहानवाज शेख, शमाली पठाण, जुनेद पठाण, मुन्नाभाई खलिफा, इजाज शेख, आरिफ कुरेशी, समीर शेख, आसिफ शेख, ईश्तियाक चौधरी, उस्मान बादशाह शेख, जानमोहम्मद पटेल, अजीज शेख, सुनील दौंड, सरफराज चौधरी, आनंद जगन्नाथ सानप, अमजद आतार, वसीम मणियार, जावेद पिंजारी, अकबर कलंदर शेख, सादिक सय्यद यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जामखेडच्या महामार्गावरील अतिक्रमण हटविण्यास सुरुवात

## मात्र नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमणांमुळे रस्त्याचे काम पुन्हा रखडणार?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ (डी) अंतर्गत खर्डा चौक ते बीड कॉर्नर या भागातील अतिक्रमणे हटवून प्रलंबित रस्ता काम पूर्ण करण्यासाठी मंगळवार (दि. २६) सकाळी ९ वाजल्यापासून जामखेड नगरपरिषद व राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या माध्यमातून संयुक्त मोहीम राबविण्यास सुरुवात करण्यात आली. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या कामाला अखेर गती मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असले, तरी अतिक्रमण हटविताना सर्वांना समान न्याय मिळावा, अशी मागणीही जोर धरत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गाचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्याने वाहन चालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. वाहतुकीचा मोठ्या प्रमाणात खोळंबा होत होता. विशेषतः बीड कॉर्नर ते खर्डा चौक या भागातील अतिक्रमणांमुळे रस्ता रुंदीकरणाचे काम अनेक महिन्यांपासून रखडले होते.या पार्श्वभूमीवर शहरातील प्रलंबित रस्ता काम पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने अनेक बैठका घेतल्या होत्या.

विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधान भवनात राष्ट्रीय महामार्गाचे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत ३१ मे पूर्वी राष्ट्रीय महामार्गाचे हद्दीतील सर्व अतिक्रमणे तातडीने हटवून रस्ता रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते.त्यानुसार मंगळवारी जामखेड नगरपरिषद, राष्ट्रीय महामार्ग विभाग, भूमी अभिलेख, महावितरण, पोलिस प्रशासन तसेच संबंधित कंत्राटदाराचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली.

रस्त्यालगत असलेले हातगाडे, दुकानांचे शेड तसेच बेकायदेशीर टपऱ्या जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आल्या.मात्र, अतिक्रमण हटविताना प्रशासनाने कुठल्याही प्रकारचा दुजाभाव करू नये, सर्वसामान्यांसोबतच धनदांडग्यांवरही समान कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमण हटविण्यात आले असले तरी नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमण कायम असल्याने लाईट पोल शिफ्ट करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे पुढील रस्ता काम पुन्हा रखडून रस्ता जैसे थे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नगरपरिषद हद्दीतील अतिक्रमणांवरही तातडीने कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधानभवनात बैठक घेऊन राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमण काढण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने बीड कॉर्नर ते खर्डा चौक या १२० मीटर अंतरातील अतिक्रमण हटवण्यास सुरुवात झाली, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.त्याबद्दल सभापती प्रा. राम शिंदे यांचे आभार.मात्र वास्तव पाहता समर्थ हॉस्पिटल, बीड रोड ते बीड कॉर्नर या भागातील गटाच्या हद्दी निश्चित झाल्यानुसार तेथील अतिक्रमणांवर कारवाई होणे क्रमप्राप्त होते.तसं न झाल्याने परत एकदा धनदांडग्यांना वाचवून सर्वसामान्यांवर अन्याय झाल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.कारवाई होत असेल तर ती सर्वांसाठी समान असावी.नियम गरीबांसाठी वेगळे आणि श्रीमंतांसाठी वेगळे नसावेत.


**–अवधूत पवार (सामाजिक कार्यकर्ते)**



# पाथर्डीत चार टपऱ्या आगीत जळून खाक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** शहरातील जुन्या बसस्थानक परिसरातील मोकळ्या जागेत उभ्या करून ठेवलेल्या काही टपऱ्यांना सोमवारी सकाळी ७.३० वा. सुमारास अचानक आग लागली. या घटनेने एकच खळबळ उडाली. या आगीत ३ ते ४ टपऱ्या जळून खाक झाल्या. नगरसेवक देवा पवार सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर कोकाटे व इतर उपस्थित तरुणांनी प्रसंगावधान दाखवून आग विझवण्यासाठी पुढाकार घेतल्याने मोठा अनर्थ टळला मात्र, पाथर्डी नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला संपर्क करुन ही अग्निशामक गाडी वेळेवर आली नाही. अग्निशामक विभागातील एकही कर्मचारी तेथे वेळेवर हजर नव्हता. २४ तास अत्यावश्यक सेवा असणाऱ्या विभागातील या कर्मचाऱ्यांची वरिष्ठांच्या फोन नंतर पळापळ सुरू झाली. उशिरा येऊन तातडीने घटनास्थळी धाव घेत त्यांनी आग आटोक्यात आणली तोपर्यंत स्थानिक तरुणांनी बचाव कार्य केले. त्यामुळे शेजारील दुकाने बचावली आणि मोठा अनर्थ टळला.



अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर काही अतिक्रमणधारकांनी आपल्या हटवलेल्या टफ्या जुन्या बसस्थानक परिसरातील मोकळ्या जागेत आणून ठेवल्या होत्या. सोमवारी सकाळी साडेसातच्या सुमारास जुन्या बसस्थानकातून शेवगाव रोडकडे जुन्या बसस्थानक परिसरातील टपऱ्यांना मोठी आग लागली होती. जाणाऱ्या मार्गालगत असलेल्या कचऱ्याला कोणीतरी आग लावली होती. हवा असल्याने या आगीने काही क्षणांतच उग्र रूप धारण केले आणि जवळच असलेल्या टपऱ्यांनी पेट घेतला. काही टपऱ्यांमध्ये लाकडी फर्निचर तसेच न वापरातील साहित्य असल्याने आगीची तीव्रता अधिक वाढली आणि पाहता पाहता टपऱ्या जळून खाक झाल्या. आगीची झळ शेजारील काही पक्क्या दुकानांपर्यंतही पोहोचली होती. सकाळच्या वेळी परिसरात नागरिकांची वर्दळ कमी असल्याने सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

# गावच्या जावयाची पीएसआयपदी निवड; ग्रामस्थांकडून सत्कार



**अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या येथील शेलार परिवाराचे जावई तथा बारदरे ता. नगर येथील सचिनराव बबन वाकचौरे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तम यश संपादन करून पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली. या यशाबद्दल कर्जुले हर्या ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. वाकचौरे यांचे वडील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. त्यांनी मुलांना शिक्षणासह चांगले संस्कार दिले. सचिन यांचे प्राथमिक शिक्षण बारदरे व पुढील शिक्षण अहिल्यानगर येथे पूर्ण केले. बारावीनंतर त्यांनी पोलीस भरतीत सहभाग घेतला. सध्या ते मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत.

यावेळी तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष गंगारामशेठ उंडे, गणेश आल्हाट, गोरख माने, विष्णू आंधळे गुरुजी, शशिकांत आंधळे, झुंबर गावडे, दत्तू वाघ, दत्तात्रय शेलार, संजय शेलार, बंटी शेलार, आकाश शेलार, विजय शिंदे, साळवे, सुनील माळी, आकाश गायकवाड, संतोष वाघ, सचिन शेलार, आनंद पवार, रोहन साळवे, अनिता वाघ, सरूबाई वाघ, सुमन वाघ, लक्ष्मीबाई शेलार, सावित्रीबाई शेलार, गीताबाई शिंदे, सिताबाई साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीगोंदा तालुक्याची ऐतिहासिक वाटचाल

## घुगलवडगाव– बेलवंडी कोठार शिव रस्त्याचे सीमांकन पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात रस्ता आदर्श तालुका उभारण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले आहे. घुगलवडगाव – बेलवंडीकोठार येथील नकाशावरील शिव रस्त्याचे अधिकृत सीमांकन पूर्ण करून रस्ता अतिक्रमणमुक्त करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

१३ मे रोजी सदर कारवाई श्रीगोंदा/पारनेर उपविभागीय अधिकारी मा. श्रीकुमार चिंचकर , तहसीलदार सचिन डोंगरे व भूमी उपअधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशाने तसेच शिवपानंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक . दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

मोजणी अधिकारी . वासुदेव पाटील यांनी शासकीय नियमानुसार सीमांकनाची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. महसूल मंत्र्यांनी घेतलेल्या शेतकरी हिताच्या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले रस्त्यांचे प्रश्न मार्गी लागत असून, शेतकऱ्यांच्या पिढ्यानपिढ्यांच्या संघर्षाला न्याय मिळत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



भविष्यात प्रत्येक गावात विकासाच्या नव्या वाटा निर्माण करून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे रस्ते मिळवून देण्याचा संकल्प चळवळीच्या माध्यमातून सातत्याने पुढे नेला जात आहे.

या कारवाईदरम्यान राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, राज्य सल्लागार अँड. कडूस पाटील उपस्थित होते. तसेच महसूल, भूमी अभिलेख व पोलीस प्रशासनाला शेतकरी खेंडके सर, दत्तात्रय हराळ गुरुजी आणि इतर सर्व शेतकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

शिवपानंद शेत रस्ते चळवळ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व सहकार्य करणाऱ्या सर्व शेतकरी बांधवांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# ‘सोलर’ योजनेचा लाभ घ्यावा : आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** वीज महावितरण कंपनीने राज्यातील घरगुती वीज ग्राहकांना नवीन योजनेद्वारे घरगुती सोलर स्कीम सुरू करण्यात आली असून या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून भरीव असे अनुदान उपलब्ध होणार असल्याने सदर योजनेचा जास्तीत – जास्त ग्राहकांनी फायदा घ्यावा असे आवाहन चापडगाव येथील वीज महावितरणचे सहाय्यक अभियंता दिनेश माळी व उपकार्यकारी अधिकारी संदीप डोळे यांनी केले आहे. या बाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले आहे की, वाढत्या वीजबिलामुळे त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांसाठी केंद्र शासनाच्या पीएम सूर्यघर योजनेसह शासनाच्या ‘स्वयंपूर्ण महाराष्ट्र निवासी रूफ टॉप स्मार्ट सोलर’ योजनेमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. महावितरण कंपनी मार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत केंद्र सरकारबरोबरच राज्य शासनाकडूनही अतिरिक्त आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याने घरगुती सोलर प्रणाली आता सर्वसामान्यांच्या आवाक्यात आली आहे.

महावितरणच्या माहितीनुसार १ किलोवॅट सोलर प्रणालीची एकूण किंमत सुमारे ५० हजार रुपये आहे. यामध्ये केंद्र शासनाकडून ३० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. तर राज्य शासनाकडून ग्राहक प्रवर्गानुसार १० हजार ते १७ हजार ५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त सहाय्य मिळणार आहे. त्यामुळे ग्राहकांना अत्यल्प रक्कम भरून सोलर प्रणाली बसविता येणार आहे. ही सदर योजनेसाठी मार्च २७ पर्यंतचा कालावधी लागू राहणार असून राज्यातील पहिल्या पाच लाख घरगुती ग्राहकांना याचा लाभ मिळणार आहे.मागील वर्षभरातील वीज वापर १०० युनिटपर्यंत अथवा त्यापेक्षा कमी असणे,सिंगल फेज वीज जोडणी आणि ग्राहकाच्या नावावर थकबाकी नसणे या अटी लागू करण्यात आल्या आहेत. १ किलोवॅट सोलर प्रणालीमधून दरमहा सुमारे ९० ते १२० युनिटपर्यंत वीज निर्मिती होऊ शकते.त्यामुळे घरगुती वीजबिल शून्याच्या जवळ जाण्याची शक्यता असून अतिरिक्त वीज वितरण कंपनीला विकून उत्पन्न मिळविण्याचाही पर्याय ग्राहकांना उपलब्ध होणार आहे.

# कुकडीचे उन्हाळी आवर्तन सुटले : सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** सोमवारी संध्याकाळी ६ वाजता येडगाव धरणाच्या कुकडी डावा कालव्यातून ५०० क्यूसेक वेगाने उन्हाळी आवर्तन विसर्ग सुरू झाल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र कर्जत–जामखेडच्या दोन्ही लोकप्रतिनिधींनी आपल्या पाठपुराव्यास यश आले या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल केल्याने कोणाचा शब्दास यश आले याचे उत्तर मिळाले नाही. सभापती राम शिंदे आणि आमदार रोहित पवार दोन्ही समर्थकांनी आपलाच नेता पॉवरफुल आशयाचे पोस्ट प्रसारित केल्या.

यावर्षी उन्हाने तब्बल चाळीशी पार केली. वाढत्या उन्हामुळे जमिनीची धूप यासह बहुतांश ठिकाणी नैसर्गिक पाण्याचे जलस्रोतांनी तळ गाठला आहे. यामुळे रब्बी पीक, फळबागा, पशुधनासाठी पाण्याची गरज होती. तसेच कर्जत तालुक्यातील जवळपास ९ गावांच्या ६४ वाड्या–वस्त्यांवर टँकरद्वारे पाणी–पुरवठा सुरू असल्याने पाणीटंचाईच्या भीषण समस्या निर्माण झाल्याने कुकडी आवर्तनाची नितांत आवश्यकता होती. सोमवार, दि २५ रोजी सायंकाळी ६ वाजता येडगाव धरणाच्या कुकडी डावा कालव्यातून ५०० क्यूसेक वेगाने उन्हाळी आवर्तन विसर्ग सुरू झाला आहे. या आवर्तनाने रब्बी पिकांचा, पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

शेतकरी बांधवांकडून सातत्याने मांडण्यात येत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने संबंधित विभागांशी समन्वय साधून हा निर्णय प्रत्यक्षात येत आहे ही समाधानाची बाब आहे. यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संबंधित यंत्रणांचे मनः पूर्वक आभार. या उन्हाळी आवर्तनामुळे रब्बी पिकांसह पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटणार आहे. या काळात उन्हाळा असल्याने पाणी टंचाई जाणवत आहे. त्यामुळे ऐन टंचाईच्या वेळी सुरू होणाऱ्या या आवर्तनाचा शेतकरी बांधवांना निश्चित फायदा होईल.

**राम शिंदे, सभापती विधान परिषद**



गेले महिनाभर सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर आणि प्रशासनासोबत घेतलेल्या बैठकीनंतर अखेर सोमवारी कुकडीचं दुसरं उन्हाळी आवर्तन सुरु झालं. वास्तविक या आवर्तनाला खूप उशीरा झाला. शेतकऱ्यांची ४२ दिवसांच्या आवर्तनाची मागणी होती पण ते २५ दिवसांचं दिलं असून आता किमान लाभक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना समान पद्धतीने हे आवर्तन मिळालं पाहिजे यासाठी ते मान्य केल्यानुसार २५ दिवस तरी कायम राहिलं पाहिजे याबाबतचं नियोजन प्रशासनाने करावं.

**आ. रोहित पवार**

## ढोरजळगाव परिसरात विहिरींनी गाठला तळ

**ढोरजळगाव :** शेवगांव तालुक्यातील ढोर जळगाव परीसरात यावर्षी विहीरी व बोअरवेलने तळ गाठल्यामुळे पिके सुकु लागली असल्यामुळे बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. मागील वर्षी ढोर जळगाव परीसरात सुरूवातीला पावसाचे प्रमाण नगण्य होते परंतु परतीच्या पावसाने सप्टेंबर महिन्यात हाहाकार माजविला होता गेला पंचवीस वर्षातील विक्रम पावसाने मोडीत काढला होता. पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. सध्या मुळाचे आवर्तन सुटले असुन मुळाचे पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी ढोरानदीमध्ये सोडण्यात यावे जेणे करून पिके जगु शकतील व पाणीटंचाईवर मात होण्यास मदत मिळेल अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. यावर्षी मार्च व एप्रिल मध्ये झालेल्या अवकाळी पावसाने पिकांना काहीसे जीवदान मिळाले असले तरी रोहीणी नक्षत्र सुरू होऊनही पाऊस पडायला तयार नसल्याने बळीराजाच्या चिंतेत भर पडली आहे.यावर्षी चांगले पर्जन्यमान राहील असे भाकित हवामान तज्ञ करत असले तरी अलनिनोमुळे पाऊस कमी असल्याचे हवामान खात्याने सांगितले जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या विवंचनेत भर पडली आहे. गेल्या कित्येक वर्षांनंतर यावर्षी सुर्य तळपला असुन अंगाची लाही लाही होत असुन फेब्रुवारी पासून उष्णता मोठ्या प्रमाणात वाढली असल्याने ग्रामस्थ उकाड्याने हैराण झाले असुन कधी पाऊस पडेल या आशेवर बळीराजा व ग्रामस्थ आभाळाकडे डोळे लाऊन बसले आहेत. यावर्षी मे महिन्यात शेवटी पाऊस पडला नसुन अलनिनोचा प्रादुर्भाव सुरूवातीला दिसुन येत असुन पाणी पातळी खालविल्यामुळे क्षारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले पाणी टंचाई तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असुन चारा पिके जगविण्यासाठी मुळाचे पाटपाणी ढोरानदीमध्ये सोडुन बंधारे भरून घ्यावेत परीणामी शेतीबरोबरच पाणीटंचाईवर मात होऊ शकते.

# जातेगाव-राळेगण सिद्धी रस्ता बनला जिवघेणा!

## मोठमोठे खड्डे, अपूर्ण कामामुळे वाहनधारक त्रस्त, नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

**विशाल फटांगडे | राष्ट्र सह्याद्री**

**जातेगाव :** जातेगाव ते राळेगण सिद्धी या महत्त्वाच्या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे हा मार्ग अक्षरशः जिवघेणा बनला आहे. अपूर्ण रस्ता काम, निम्म्या भागात झालेले खडीकरण आणि सर्वत्र पडलेले मोठमोठे खड्डे यामुळे वाहनधारक, विद्यार्थी, शेतकरी व नागरिकांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.



जातेगाव ते राळेगण सिद्धी हा परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा संपर्कमार्ग आहे. या रस्त्यावरून दररोज शाळा–कॉलेजचे विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात ये–जा करतात. मात्र, गेल्या जवळपास वर्षभरापासून सुरू असलेले रस्त्याचे काम रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

रस्त्याच्या अनेक भागात मोठमोठे खड्डे पडले असून वाहन चालवताना चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता धोकादायक ठरत असून सैल खडी आणि खोल खड्ड्यांमुळे अपघातांची शक्यता वाढली आहे. चारचाकी वाहनांचेही मोठे नुकसान होत असून वाहनधारकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

रस्त्याच्या निम्म्या भागात केवळ खडीकरण करून काम अर्धवट सोडण्यात आले आहे. त्यामुळे उडणारी धूळ, असमतोल रस्ता आणि खड्ड्यांचे साम्राज्य यामुळे नागरिकांचे आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आली आहे. आगामी पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी अनेकदा संबंधित विभागाचे लक्ष वेधले, मात्र अद्याप कामाला गती मिळालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून रखडलेले काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी जोर धरत आहे.

**निकृष्ट व रखडलेल्या कामाबाबत कंत्राटदारावर कारवाईची मागणी**

जातेगाव ते राळेगण सिद्धी रस्त्याचे काम संथगतीने सुरू असून अपूर्ण कामामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे, अर्धवट खडीकरण आणि वाढता अपघाताचा धोका पाहता संबंधित कंत्राटदारावर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांमध्ये हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. रखडलेल्या व निकृष्ट कामासाठी जबाबदार असलेल्या कंत्राटदारावर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी संतप्त भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे. रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून दर्जेदार रस्ता उपलब्ध करावा, अन्यथा प्रशासनासह संबंधित कंत्राटदाराविरोधात तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

**वर्षभरापासून खराब रस्त्याचा विद्यार्थ्यांना फटका; जीव धोक्यात घालून करावा लागतो शिक्षणासाठी प्रवास**

पळवे खुर्द, पळवे बुद्रुक, घाणेगाव, म्हसणे आणि जातेगाव या परिसरातील मोठ्या प्रमाणातील विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज राळेगण सिद्धीकडे ये–जा करतात. मात्र, जवळपास वर्षभरापासून खराब झालेल्या रस्त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे, अपूर्ण काम आणि खडीकरणामुळे विद्यार्थ्यांचा रोजचा प्रवास धोकादायक बनला आहे. शाळेत वेळेवर पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठी कसरत करावी लागत असून पालकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षित रस्ता देणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही का? असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

**नागरिकांचा आंदोलनाचा इशारा; अण्णासाहेब हजारे यांच्या गावाकडे जाणाऱ्या रस्त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष का?**

जातेगाव ते राळेगण सिद्धी हा मार्ग देशभरात आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे यांच्या राळेगण सिद्धीकडे जाणारा महत्त्वाचा रस्ता आहे. मात्र, याच रस्त्यावर आज मोठमोठे खड्डे पडले असून अपूर्ण कामामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.आदर्श गावाकडे जाणाऱ्या रस्त्याचीच अशी अवस्था असेल, तर सामान्य भागातील विकासाची परिस्थिती काय असेल? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तातडीने काम पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.२७ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## नाऊर येथे बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर चेक पोस्ट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नाऊर** : बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वौकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर तालुक्यातील नाऊर येथे श्रीरामपूर-वैजापूर या दोन्ही तालुक्याच्या हद्दीवर गोमास वाहतूक होऊ नये,विशेष नियत्रणासाठी मंगळवारी पोलीस चेक उभारण्यात आले.त्यावेळी वाहनाची तपासणी केली जात होती. यावेळी पोलीस कॉ.विशाल मैद, होमगार्ड सागर साबळे, शांतवन अमोलिक कडक तपासणी सुरू होती.

# मान्सूनपूर्व पावसाचा तडाखा

## शेतकऱ्याच्या १० मेंढ्यांचा मृत्यू



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील पिंप्री-लौकी अजमपुर परिसरात रविवारी (दि. २४) सायंकाळी झालेल्या जोरदार मान्सूनपूर्व पावसाने आणि वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. या नैसर्गिक आपत्तीत रावसाहेब मुंढे या मेंढपाळ शेतकऱ्याच्या १० मेंढ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, त्यांचे सुमारे दीड ते दोन लाख रुपयांचे अर्थिक नुकसान झाले आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, रविवारी सायंकाळी ६ ते ७ वाजेच्या सुमारास पिंप्री-लौकी अजमपूर परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली. सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह झालेल्या या पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. यातच रावसाहेब मुंढे यांच्या मेंढ्यांच्या वाड्यावर वीज कोसळल्याने १० मेंढ्या जागीच मृत्युमुखी पडल्या. मागील आठवड्यापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने या भागातील शेतकरी आधीच संकटात सापडले असताना, या घटनेने मेंढपाळ कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

या घटनेची माहिती मिळताच भाजपचे सरचिटणीस भारत गिते यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत शेतकऱ्यांची भेट घेतली आणि त्यांना धीर दिला. त्यांनी तात्काळ प्रशासनाला या घटनेची माहिती दिली. तसेच, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि संगमनेरचे तहसीलदार धीरज मांजरे यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीची कल्पना दिली. सोमवारी सकाळी (दि. २५) घटनास्थळी सीताराम दातीर, बाळु दातीर, सचिन दातीर, विनोद लावरे, सुभाष गिते, पोलीस पाटील मच्छिंद्र चकोर, तलाठी आशुतोष वाकडे, संगीता भारत गिते आदिनी उपस्थित राहत पंचनामा केला.

पालकमंत्री विखे पाटील यांनी या घटनेची गंभीर दखल घेत, संबंधित विभागाला तातडीने पंचनामे पूर्ण करून गरीब मेंढपाळ शेतकऱ्याला शासकीय मदत मिळवून देण्याचे आदेश दिल्याची माहिती भारत गिते यांनी दिली. दरम्यान, अवकाळी आणि वादळी वाऱ्याचा फटका केवळ मेंढपाळांनाच नव्हे, तर परिसरातील लिंबू बागायतदार शेतकऱ्यांनाही बसला आहे. वादळामुळे लिंबू बागांचेही मोठे नुकसान झाले असून, त्यांचेही तत्काळ पंचनामे करून दिलासा द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भारत गीते यांनी पालकमंत्र्याकडे केली आहे.

## शेतीत बोर घेण्यास विरोध ४५ वर्षीय महिलेचा विनयभंग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील बारागाव नांदुर परिसरात शेतीच्या वादातून ४५ वर्षीय महिलेचा विनयभंग करून मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी राहुरी पोलिसांनी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि. १५ मे २०२६ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास पीडित महिला त्यांच्या शेतात फेरफटका मारण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी संबंधित आरोपी शेतीमध्ये बोर घेत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. जमिनीचे वाटप झालेले नसल्याने तुम्ही या शेतीमध्ये बोर घेऊ शकत नाही, असे महिलांनी सांगितल्याचा आरोपींना राग आला.

यावेळी आरोपींनी महिलेस मिठी मारून तिचा ब्लाउज फाडत विनयभंग केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच चाकूचा धाक दाखवत लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. महिलेच्या आरडाओरडीनंतर तिची आत्या व वडील भांडण सोडविण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ, दमदाटी व मारहाण केली. तुला जमीन व प्लॉट काहीही देणार नाही, जिवे मारून टाकू, अशी धमकी देत आरोपी तेथून पसार झाले. पीडित महिलेने आरोपींकडून यापूर्वीही त्रास देण्याचे प्रयत्न झाल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी सुनिल रामदास गाडे व सनी सुनिल गाडे या दोघांविरोधात राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये विनयभंग, मारहाण व धमकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार विकास वैराळ करीत आहेत.

## आरोपीच्या शोधासाठी पथके रवाना वाळूवरून झालेले धुमश्चक्री प्रकरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील वैजापूर तालुक्यातील बाभूळगावगंगा येथे गोदावरी नदीपात्रात शेतकऱ्यांवर गोळीबार करणाऱ्या श्रीरामपूरातील वाळूतस्करांच्या शोधासाठी तीन पथके रवाना करण्यात आली आहेत. या फरार आरोपीत श्रीरामपुरातील अपक्ष नगरसेवक पैलवान अर्जुन दाभाडे याचाही समावेश आहेत.छत्रपती संभाजीनगरचे पोलिस व महसूल प्रशासनाने घटनेचे गांभीर्याने ओळखून पोलीसांचे पथके आरोपींच्या मागावर असल्याचे सांगण्यात आले.श्रीरामपूर व वैजापूर तालुक्याच्या हद्दीतून गोदावरी नदीत नाऊर, नायगाव व तसेच बाभूळगावगंगा येथील हद्दीत रविवारी रात्री वाळूतस्करांनी शेतकऱ्यावर हल्ला केला.यात बाभूळगावगंगा येथील जालिंदर सोपान कुंजीर (वय ४५) यांच्यावर नदीपात्रात 'वीजपंप सुरू करण्यासाठी गेले असता गोळीबार करण्यात आला होता.न

दीपात्रामध्ये शेतकऱ्यांवर दोन गोळ्या झाडल्याची माहिती आहे.याबाबत पोलिस प्रशासनाने गांभिर्य ओळखून तातडीने पावले उचल्याचे बोलले जाते. गंभीर गुन्हयातील आरोपीना जेरबंद करण्यात येईल, प्रशासनाच्या सुत्रांकडून समजले.

## बेलापूरात अवैध वाळून वाहतुकीचा टेम्पो पकडला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बेलापूर - ऐनतपूर शिवारात अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा टेम्पो पोलिसांनी पकडला असून, ५ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस अधीक्षक मुमक्का एम सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे किरणकुमार कबाडी, उपनिरीक्षक संदिप मुरकुटे, पोलीस हवालदार पंकज व्यवहारे, भगवान थोरात, विशाल तनपुरे यांचे पथक अवैध वाळू उपशाविरोधात कारवाई करण्यासाठी श्रीरामपूर शहर पोलीस हद्दीत पेट्रोलिंग करत असताना ऐनतपूर गावच्या शिवारात एक वीटकरी रंगाचा टेम्पो चोरून वाळू वाहताना आढळून आला. तेव्हा सदर टेम्पो अडवून चालकाचे नाव विचारले असता, त्याने आकाश नाना निकम, (रा. आठवाडी,) असे नाव सांगितले. त्याच्याकडून २० हजार रू. किंमतीची दोन ब्रास वाळू आणि ५ लाखांचा टेम्पो असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला.पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहे.

## मागील भांडणाचा राग धरून बेदम मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मागील भांडणाच्या कारणावरुन आरोपींनी किशोर औटी यांना लोखंडी रॉड व पाईपने बेदम मारहाण करत शिवीगाळ दमदाटी केली. ही घटना राहुरी तालुक्यातील मोकळ ओहळ येथे दि. २३ मे सायंकाळी घडली. हर्षल किशोर औटी, वय २४ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील मोकळ ओहळ येथे राहत आहेत. तेथे हर्षल औटी व आरोपीचे दुकान शेजारी शेजारी आहेत.

काही दिवसापुर्वी शंकर जाधव याने दारू पिऊन हर्षल औटी यांच्या आईला दुकाना समोर येऊन शिविगाळ केली होती. ते वाद आपापसात मिटले होते. त्यांनतर दि. २३ मे २०२६ रोजी संध्याकाळी ६.३० वाजेच्या सुमारास आरोपींनी मागील भांडणाच्या कारणावरुन किशोर औटी यांना दुकाना बाहेर बोलावुन घेतले.

आणि लोखंडी रॉड, लोखंडी पाईपने बेदम मारहाण केली. तसेच शिवीगाळ दमदाटी करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. या घटने बाबत किशोर औटी यांचा मुलगा हर्षल याने आरोपी महेश लोणारी यास फोन करुन विचारणा केली. तेव्हा आरोपी म्हणाला मी तुझ्यावर ट्रॉसिटीची केस दाखल करतो, तुमचे दुकान जाळुन टाकतो, दुकान चालु देणार नाही. असे म्हणुन शिवीगाळ दमदाटी केली आहे. हर्षल किशोर औटी यांच्या फिर्यादीवरून आरोपी महेश प्रल्हाद लोणारी, अनिल जाधव, शंकर जाधव सर्व रा. मोकळ ओहळ, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

या घटनेत किशोर औटी हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# १५४ कोटींचा महामार्ग की नागरिकांच्या जिवाशी खेळ?

## अवघ्या दोन किलोमीटरच्या तुकड्यामुळे प्रवरा नदीचा पूल बनला 'डेथ ट्रॅप'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : राहाता-पानोडी (संगमनेर) या ३६ किलोमीटर लांबीच्या काँक्रीट महामार्गासाठी तब्बल १५४ कोटी रुपये खर्च केले जात आहेत. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळातर्फे या कामाचा वेग आणि गुणवत्ता वाखाणण्याजोगी असली, तरी याच महामार्गावरील आश्वी बुद्रुक शासकीय विश्रामगृह ते आश्वी खुर्द प्रवरा उजवा कालवा या अवघ्या दोन किलोमीटरच्या टप्प्याने मात्र प्रशासकीय नाकर्तेपणाचा कळस गाठला आहे. एका बाजूला चकचकीत रस्ता आणि दुसरीकडे थेट मृत्यूला आमंत्रण देणारे खड्डे, अशा दुहेरी कोंडीत आश्वी परिसरातील नागरिक अडकले आहेत. मागील पावसाळ्यात या रस्त्याची चाळण झाली होती. आता पुन्हा एक पावसाळा तोंडावर आला आहे, मात्र रस्ता दुरुस्तीचे साधे सोपस्कारही पार पाडण्यात आलेले नाहीत. त्यामुळे रोज विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरून येथून प्रवास करावा लागत आहे.

### प्रवरा नदीचा पूल की अपघातांचे केंद्र?

या महामार्गावरील प्रवरा नदीचा पूल सध्या अपघातांचे मुख्य केंद्र बनला आहे. पुलावरील डांबर पूर्णपणे उखडले असून, आरपार दिसणारे मोठमोठे खड्डे पडले आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूंचे पाण्याचा निचरा करणारे पाईप चोक झाले असून, तिथे माती साचून गवत उगवले आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, पुलाच्या दोन्ही बाजूंना कोणतेही दिशादर्शक किंवा चेतावणी देणारे फलक लावलेले नाहीत.

### तरुणांची सामाजिक जाणीवही प्रशासकीय उदासीनतेपुढे हतबल!

सहा महिन्यांपूर्वी आश्वी खुर्द आणि बुद्रुकच्या तरुणांनी एकत्र येत या पुलावर मोठे स्वच्छता अभियान राबवले होते. स्वखर्चाने व लोकवर्गणीतून खड्ड्यांमध्ये काँक्रीट भरून रस्ता तात्पुरता दुरुस्त केला होता. मात्र, दिवस-रात्र होणारी जड वाहतूक आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे हे खड्डे पुन्हा जैसे थे झाले आहेत. तरुणांचे सामाजिक कार्य प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे वाया गेले आहे.

### २ किलोमीटरचा 'हा' टप्पा का महत्त्वाचा?

प्रमुख जोड रस्ता: हा रस्ता केवळ दोन गावांना जोडत नसून, संगमनेर, लोणी आणि साकूर या प्रमुख मार्गांना जोडणारा मुख्य दुवा आहे.

### १५ ते २० गावांची लाईफलाईन

दररोज १५ ते २० गावांतील हजारो नागरिक याच रस्त्याने प्रवास करतात.
मुख्य बाजारपेठ: या दोन किलोमीटरच्या परिघात आठवडे बाजार, शाळा, बँका, पेट्रोल पंप, दवाखाने आणि शोरूम्स असल्याने येथे चोवीस तास मोठी वर्दळ असते.

### नागरिकांचा 'झणझणीत' इशारा!

१५४ कोटींचा निधी मंजूर असताना, अवघ्या दोन किलोमीटरच्या तुकड्यासाठी नागरिकांनी आपल्या प्राणाची आहुती द्यायची का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. प्रशासनाने, संबंधित ठेकेदाराने आणि महामंडळाने तातडीने या दोन किलोमीटरच्या टप्प्यातील खड्डे बुजवून रस्त्याचे काम पूर्ण करावे, अन्यथा संतप्त नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा जाहीर इशारा आश्वी परिसरातील जनतेने दिला आहे.

आता तरी ढिम्म प्रशासन जागे होऊन या 'नरकयातने'तून नागरिकांची सुटका करणार का, की एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जेडीसीए परीक्षेचा फटका! श्रीगोंदा तालुक्यात एडीसीसीच्या २० शाखा 'रामभरोसे'

**दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : सहकार आणि लेखा विषयात शासकीय पदविका म्हणजे गऊऋ- परीक्षेमुळे श्रीगोंदा तालुक्यातील बहुतांश एडीसीसी बँक शाखांमधील अनेक कर्मचारी विनापरवानगी गैरहजर राहिल्याने श्रीगोंद्यात अहमदनगर जिल्हा बँकेची बँकिंग सेवा अक्षरशः विस्कळीत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

विशेष म्हणजे याबाबत तालुका विकास अधिकारी यांच्यासह ३६ कर्मचारी गायब असल्याचे निदर्शनास आले असून याबाबत कोणालाच काही माहित नसल्यामुळे सगळे काही आलबेल सुरु असल्याची जोरदार चर्चा सुरु आहे.

राज्य सरकारच्या निर्देशानुसार सहकार विभागात सहकार आणि लेखा विषयात शासकीय पदविका म्हणजे गऊऋ- यांची परीक्षा घेण्यात येते त्या परीक्षेसाठी अहमदनगर जिल्हा सहकारी बँक अहिल्यानगर च्या श्रीगोंदा तालुक्यातील २० शाखालामधील तब्बल ३६ कर्मचारी गायब असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे याबाबत तालुक्यात एकूण ९६ कर्मचारी कार्यरत असताना तब्बल ३६ कर्मचारी, त्यात तालुका विकास अधिकारी पोपटराव व्यवहारे यांच्यासह, वरिष्ठ कार्यालयाला कोणतीही पूर्वकल्पना न देता गैरहजर राहिल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

यामुळे अनेक शाखांमध्ये केवळ ठेकेदारी पद्धतीवरील कर्मचारी कामकाज सांभाळताना दिसले. परिणामी खातेदारांना आवश्यक बँकिंग सेवा मिळण्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. बँकेत कर्मचारीच नाहीत, मग आमची कामं कोण करणार? असा संतप्त सवाल खातेदारांनी उपस्थित केला.विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकाराची जबाबदारी असलेले तालुका विकास अधिकारी पोपटराव व्यवहारे हे गेल्या दोन दिवसांपासून संपर्काबाहेर असल्याचे समोर आले आहे.

त्यांचा मोबाईल बंद असून शाखांशीही संपर्क नसल्याने तालुक्याच्या २० एडीसीसी शाखांचा वाली कोण? असा प्रश्न उपस्थित होत आहे.व्यवहारे यांच्या अनुपस्थितीमुळे तालुक्यातील बँक व्यवहार ठप्प झाले की काय, अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.दरम्यान, या प्रकरणाबाबत एडीसीसी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर रावसाहेब वरपे यांच्याशी संपर्क साधला असता, हा प्रकार आमच्या निदर्शनास आला नव्हता.

## कायद्याचे पालन करून बकरी ईद शांततेत साजरी करा : अप्पर पोलीस अधीक्षक वाकचौरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर शहर व परिसरातील मुस्लिम बांधवांनी शासनाच्या नियमांचे पालन करून सण शांततेत आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन सोमनाथ वाकचौरे यांनी केले. येथील कुरेशी जमात खाना येथे आयोजित कुरेशी समाज व मुस्लिम समाजाच्या संयुक्त बैठकीत ते बोलत होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते गफार पोपटीया होते. यावेळी जयदत्त भवर, नितीन देशमुख, नगरसेवक अंजुमभाई शेख, अहमदभाई जागीरदार, मुक्तार शहा, कलीम कुरेशी, साजिद मिर्झा, जोएफ जमादार आदी उपस्थित होते. वाकचौरे म्हणाले की, श्रीरामपूर परिसरात गोवंश हत्येचे गुन्हे सातत्याने दाखल होत असून बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षभरात अशा गुन्ह्यांत सहभागी असलेल्या १२२ जणांना आठवडाभरासाठी तडीपार करण्यात आले आहे. शासनाने गोवंश हत्या प्रकरणात मकोका कायद्याची अंमलबजावणी सुरू केली असून नागरिकांनी कायद्याचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

जनावरांच्या खरेदी-विक्री व्यवहाराच्या पावत्या जवळ बाळगाव्यात, असेही त्यांनी सांगितले.



कुरेशी समाजाचे अध्यक्ष महबूब कुरेशी यांनी समाजाच्या वतीने बकरी ईद निमित्त गोवंश कुरबानी न करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. तसेच जनावरे खरेदी-विक्री व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना विनाकारण त्रास होऊ नये, अशी मागणी त्यांनी केली. नगरसेवक अंजुमभाई शेख, मुक्तार शहा व संविधान बचाव समितीचे अध्यक्ष अहमदभाई जहागीरदार यांनी मुस्लिम समाज कायद्याचे पालन करूनच बकरी ईद साजरी करेल, असा विश्वास व्यक्त केला. नगरपालिकेकडून आवश्यक व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य निरीक्षक संजय आरणे यांनी दिली.

# पेरते व्हा....पेरते व्हा...

## पावश्या पक्षाचे ओरडणे देते पावसाच्या आगमनाचे संकेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : असे म्हटले जाते की निसर्गातील बदलांची चाहूल सर्वात आधी पशुपक्ष्यांना लागते त्यामुळेच पशुपक्षी दक्ष राहून आपले संरक्षण करण्याच्या दृष्टीने वाटचाल करीत असतात पक्षीप्रेमी देखील या पक्षांच्या हालचालीवर लक्ष ठेवून आपले अंदाज व्यक्त करीत असतात.

कोल्हार भगवतीपुर परिसरात गेली पाच-सहा दिवसापासून पावश्या पक्षी परिसरातील झाडावर ओरडून परिसरातील शेतकऱ्यांना पेरते व्हा.. पेरते व्हा. असे सांगत पावसाचे संकेत देत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे कोल्हार परिसरातील नागरिक व शेतकरी वर्गात पावश्या पक्षी पावसाचे संकेत देत



असल्याची चर्चा करीत असून आकाशात दाटलेल्या ढगाकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत व शेतकरी व नागरिक पाऊस बरसून वातावरण अल्हाददायक बनण्याची देखील वाट पाहत आहे.

गेले दोन-तीन महिन्यापासून रखरखीत व अंगाची लाही लाही करणाऱ्या कडक उन्हामुळे संपूर्ण महाराष्ट्रभरातील जनता या उष्णतेमुळे चांगलीच हैराण झाली कधी एकदा उन्हाळा संपून वर्षा ऋतूचे आगमन होते याचीच प्रत्येक जण वाट पाहत आहे त्यातच गेली पाच-सहा दिवसापासून कोल्हार भगवतीपुर परिसरातील झाडांवर पावश्या पक्षाचे ओरडणे शेतकरी व नागरिकांना दिलासा देत आहे हवामान खात्यानेकेरळ मध्ये मान्सून चे आगमन वेळे आधीच होत असल्याची दिलासादायक व आनंदाची बातमी वृत्तपत्रातून व वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून दिल्यामुळे देखील मोसमी पावसाबाबत जनतेच्या आशा वाढल्या असून महाराष्ट्रात देखील मोसमी पाऊस वेळेआधीच बरसणार असल्याचेही हवामान खात्याकडून सांगण्यात आले आहे.

तर नगर जिल्ह्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाने वादळ वाऱ्यासह व विजेच्या कडकडाटा सहित हजेरी लावली असून अनेक ठिकाणी शेतीमालाचे नुकसानही केले आहे. असे असले तरी पेरणीसाठी मोसमी पाऊस बरसण्याची शेतकरी वर्ग चातकासारखी वाट पाहत आहे.

त्यामुळेच पेरते व्हा.... पेरते व्हा... करणारा पावश्या पक्षी मात्र पावसाचे संकेत देत असल्याचे बोलले जात आहे.

## पूर्ववैमनस्यातून तरुणावर हल्ला

### बिशप लॉईड कॉलनीतील घटना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : शहरातील बिशप लॉईड कॉलनी मकासरे क्लब समोर पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर लोखंडी पाईप आणि धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. या हल्लयात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जय रवी खरात (वय २७, व्यवसाय- फायनान्स, रा. बिशप लॉईड कॉलनी, अहिल्यानगर) हा तरुण आपल्या घरात असताना मध्यरात्रीच्या सुमारास ही घटना घडली. जुन्या वादाचा राग मनात धरून आरोपी प्रविण मधुकर सोनवणे याने जय खरात याला गाठले. आरोपीने लोखंडी पाईपने जय याला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच धारदार शस्त्राने वार करून त्याला गंभीर दुखापत केली.

हा वाद सोडवण्यासाठी जखमी तरुणाची पत्नी मध्यस्थी करण्यासाठी आली असता, आरोपीने तिलाही अत्यंत अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच तुम्हाला जिवंत मारून टाकीन, अशी धमकी देत परिसरात दहशत निर्माण केली. या झटापटीत आरोपीने फिर्यादीचा मोबाईल हिसकावून त्याचे मोठे नुकसान केले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून जखमीला तातडीने अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जे. सी. भांबळ यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळाची पाहणी केली. जखमी जय खरात याने दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी आरोपी प्रविण सोनवणे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ३२४ (२), ३५२, ३५१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार दीपक गांगर्डे आणि प्रवीण पांडागळे करत आहेत.